




दैनिक

# युवावार्ता

परिवर्तनाचा पुरस्कर्ता

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

RNI No. MAHMAR/2007/24252

तिकीट न लावण्याचा
पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक
BII/RNP/SRP/25/2023-25









अहिल्यानगर । वर्ष १९ वे । अंक १४० । किंमत - २ रू संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) गुरूवार । ११/०६/२०२६ । पाने - ६







# रामराव महाराज ढोक यांच्या रामकथेने हजारो भाविक मंत्रमुग्ध

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - अधिकमासानिमित्त आयोजित अखंड हरिनाम सप्ताहात रामायणाचार्य रामराव महाराज ढोक यांच्या रसाळ, ओजस्वी आणि भावस्पर्शी रामकथेने गुंजाळवाडी परिसर भक्तिमय वातावरणाने भारून गेला आहे. रामकथेचा आध्यात्मिक गूढार्थ, भक्ती, ज्ञान, कर्म, वैराग्य आणि शरणागती यांचा सुंदर संगम उलगडत महाराजांनी उपस्थित हजारो भाविकांना रामनामाच्या अखंड चिंतनात रंगवून टाकले. अधिकमासातील आठव्या पर्वातील दुसऱ्या भागात भगवान श्रीरामांच्या जन्मप्रसंगाचे आणि रामनामाच्या महिम्याचे केलेले निरूपण भाविकांसाठी अविस्मरणीय ठरले.

## प. पू. स्वामी गगनगिरी महाराज सप्ताह





स्वर्गीय जयवंतराव गुंजाळ व श्री बाळासाहेब गुंजाळ यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ गुंजाळ मळा, गुंजाळवाडी येथे आयोजित या रामकथा सोहळ्यास दररोज मोठ्या संख्येने भाविक उपस्थित राहत आहेत. रामकथेच्या माध्यमातून भगवान श्रीरामांच्या चरित्रातील विविध प्रसंगांचा आध्यात्मिक अर्थ उलगडून सांगताना महाराजांनी भारतीय संस्कृती, धर्म आणि कुटुंबव्यवस्थेचे महत्त्व अधोरेखित केले.

रामकथा ही केवळ एका स्थळापुरती मर्यादित नसून संपूर्ण भारतवर्षाच्या आध्यात्मिक परंपरेचा अमूल्य ठेवा असल्याचे सांगताना महाराजांनी प्रयाग, कैलास, नीलगिरी आणि अयोध्या या पवित्र परंपरांचा उल्लेख केला. याज्ञवल्क्य ऋषी व भारद्वाज, भगवान शंकर व पार्वती माता, काकभुशुंडी व गरुड तसेच गोस्वामी तुलसीदास यांच्या माध्यमातून रामकथेचे महात्म्य मानवजातीपर्यंत पोहोचल्याचे त्यांनी सांगितले.

रामायणातील पात्रांचे आध्यात्मिक स्वरूप स्पष्ट करताना दशरथ म्हणजे वेद, कौसल्या म्हणजे ज्ञानशक्ती, सुमित्रा म्हणजे उपासना आणि कैकयी म्हणजे क्रियाशक्ती असल्याचे त्यांनी विवेचन केले. कथा केवळ ऐकून न थांबता तिचे चिंतन आणि आचरण जीवनात उतरविल्यासच तिचा खरा लाभ मिळतो, असेही त्यांनी नमूद केले.

राजा शीलनिधी, विश्वमोहिनी विवाह सोहळा तसेच सीतामाईंच्या जन्माची कथा सांगताना महाराजांच्या प्रभावी वाणीने उपस्थित भाविक अक्षरशः मंत्रमुग्ध झाले. जनकराजांच्या नांगराच्या फाळातून भूमीतून प्रकट झालेली भूमिकन्या पुढे जगन्माता जानकी म्हणून पूजली गेली, या प्रसंगाचे वर्णन ऐकताना अनेकांच्या डोळ्यांत भक्तिभाव दाटून आला.

राम-सीतेच्या विवाहापासून वनवास, रावणवध, अयोध्येला पुनरागमन आणि धर्मसंस्थापनेसाठी भगवान श्रीरामांनी केलेल्या अवतारकार्याचे सखोल विवेचन करताना त्यांनी धर्मरक्षणाचा संदेश दिला. सज्जनांचे रक्षण आणि दुष्टांचा विनाश करण्यासाठीच भगवान अवतार धारण करतात, असे सांगत रामावतारामागील दैवी हेतू उलगडून दाखविला.

श्रावण बाळाच्या अद्वितीय मातृ-पितृभक्तीची कथा सांगताना वातावरण भावनिक झाले. माता-पित्यांना खांद्यावर घेऊन काशीविश्वेश्वराच्या दर्शनासाठी निघालेल्या श्रावण बाळाच्या त्यागमय जीवनाचे वर्णन ऐकून अनेक भाविकांच्या डोळ्यांत अश्रू तरळले. आजच्या पिढीने माता-पित्यांची सेवा आणि संस्कारांचे जतन करणे हीच खरी रामभक्ती असल्याचा संदेशही महाराजांनी दिला.

## विज्ञानासोबत संस्कृती आणि अध्यात्म जपा : स्वामी नरेंद्राचार्यजी



परमपूज्य श्री स्वामी गगनगिरी महाराज हरिनाम सप्ताहाच्या निमित्ताने संगमनेर परिसरात भक्ती आणि अध्यात्माचे वातावरण निर्माण झाले आहे. अधिक मासानिमित्त आयोजित या सप्ताहात जगद्गुरु रामानंदाचार्य स्वामी श्री नरेंद्राचार्यजी महाराज यांच्या उपस्थितीमुळे सोहळ्याला विशेष आध्यात्मिक उंची लाभली. यावेळी स्वामी नरेंद्राचार्यजी महाराज यांनी आपल्या प्रवचनातून श्री स्वामी गगनगिरी महाराजांच्या तपश्चर्येचा आणि कार्याचा गौरव करत धर्म, संस्कृती, कर्तव्य आणि भक्तीचे महत्त्व विशद केले. विज्ञानासोबत अध्यात्म आणि संस्कृतीची मुळे जपणे आवश्यक असल्याचे सांगत त्यांनी निसर्ग संवर्धनाचाही संदेश दिला. स्वामीजींच्या विचारांनी भाविक भारावून गेले. जय गगनगिरी महाराज आणि हरिनामाच्या जयघोषांनी परिसर दुमदुमून गेला. राज्यभरातून आलेल्या भाविकांनी दर्शन, प्रवचन आणि महाप्रसादाचा लाभ घेत भक्तिमय वातावरणात आध्यात्मिक आनंद अनुभवला.

# इंजि. हरिभाऊ गिते यांच्याकडे मुख्य अभियंता पदाचा अतिरिक्त कार्यभार

युवावार्ता (प्रतिनिधी)

तळेगाव दिघे - संगमनेर तालुक्यातील सोनोशी येथील भूमिपुत्र आणि नाशिक मृद व जलसंधारण विभागाचे अधीक्षक अभियंता हरिभाऊ गिते यांच्याकडे राज्य शासनाच्या सुधारित आकृतिबंधानुसार नव्याने निर्माण करण्यात आलेल्या छत्रपती संभाजीनगर येथील 'मुख्य अभियंता, मृद व जलसंधारण' या पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आला आहे.



राज्य शासनाच्या मृद व जलसंधारण विभागाने शासनादेश आहे. सदर महत्त्वाचा जारी केला सुधारित आकृतिबंधानुसार छत्रपती संभाजीनगर येथे मुख्य अभियंता कार्यालय नव्याने निर्माण करण्यात आले आहे. या नवीन कार्यालयाचे कार्यक्षेत्र छत्रपती संभाजीनगर आणि नाशिक हे दोन महसुली विभाग असणार आहे. सध्या हरिभाऊ गिते हे नाशिक येथे अधीक्षक अभियंतापदी तसेच संभाजीनगर येथे गुणनियंत्रण कक्षात कार्यरत आहेत. आता गिते यांनी त्यांच्या मूळ पदाचे कामकाज सांभाळून हा अतिरिक्त कार्यभार सांभाळावा, असे आदेशात नमूद करण्यात आले आहे. राज्यपालांच्या आदेशानुसार व नावाने अवर सचिव श. ह. खारोडे यांनी हा आदेश तत्काल प्रभावाने जारी केला आहे. गिते यांच्याकडे छत्रपती संभाजीनगर येथील 'मुख्य अभियंता, मृद व जलसंधारण' या पदाचा अतिरिक्त कार्यभार पदभार दिल्यामुळे या विभागातील कारभारात सकारात्मक बदल होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. या नियुक्तीबद्दल हरिभाऊ गिते यांचे सर्वस्तरातून कौतुक करण्यात येत आहे. हरिभाऊ गिते हे केवळ प्रशासकीय अधिकारी नाहीत, तर सरळसेवा प्रविष्ट वर्ग-१ अभियांत्रिकी अभियंता अधिकारी संघटनेच्या माध्यमातून अभियंत्यांच्या प्रश्नांसाठी त्यांनी प्रभावी नेतृत्व केले आहे.

# पावसाळ्यापूर्वी नवीन नगर रोडवरील गटारींच्या स्वच्छता व दुरुस्तीला वेग - गणेश गुंजाळ

युवावार्ता (प्रतिनिधी) :

संगमनेर - पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर संगमनेर शहरातील सर्वाधिक वर्दळीच्या आणि व्यावसायिक दृष्ट्या महत्त्वाच्या नवीन नगर रोड परिसरातील गटारींची स्वच्छता व दुरुस्तीची कामे नगरपालिकेकडून युद्धपातळीवर हाती घेण्यात आली आहेत. पावसाळ्यात पाणी तुंबून नागरिक व व्यावसायिकांना होणारा त्रास टाळण्यासाठी ही उपाययोजना करण्यात येत असल्याची माहिती या प्रभागाचे नगरसेवक गणेश गुंजाळ यांनी दिली.





संगमनेर शहरातील मालदाड रोड परिसरातून वाहणारा ओढा नवीन नगर रोड मार्गे पुढे नाटकी नाला बनून भारत नगर, अलका नगर परिसरातून प्रवरा नदीला जाऊन मिळतो. पावसाळ्यात या ओढ्यातून मोठ्या प्रमाणावर पाण्याचा प्रवाह होत असतो. मात्र गेल्या काही वर्षांत या नैसर्गिक प्रवाहाचे स्वरूप बदलून त्याचे गटारीत रूपांतर झाले आहे.

परिसरातील काही नागरिक व व्यावसायिकांकडून गटारीमध्ये प्लास्टिक कचरा, सांडपाणी व इतर घाण टाकली जात असल्याने गटारांमध्ये अडथळे निर्माण होतात.


पान नं. ४ वर












# मोदी सरकार जनविश्वासाचा प्रवास : विकास, सुशासन आणि लोकसहभागाची बारा वर्षांची वाटचाल








बारा वर्षांचा कालावधी म्हणजे भारतीय परंपरेत एका तपाची पूर्तता मानली जाते. तप म्हणजे केवळ कालगणना नव्हे, तर सातत्यपूर्ण प्रयत्न, ध्येयासाठीची निष्ठा आणि संकटांवर मात करत उद्दिष्ट साध्य करण्याची प्रक्रिया होय. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील २०१४ ते २०२६ हा कालखंड अशाच एका परिवर्तनाच्या प्रवासाचा साक्षीदार ठरला आहे. या काळात शासनाच्या विविध उपक्रमांमधून विकास, जनकल्याण, सुशासन आणि राष्ट्रीय आत्मविश्वासाला नवी दिशा मिळाल्याचा दावा केला जातो.

या बारा वर्षांचा केंद्रबिंदू म्हणजे सर्वसामान्य नागरिकाला विकास प्रक्रियेचा भाग बनवण्याचा प्रयत्न. सरकारच्या विविध योजनांमुळे समाजातील वंचित घटकांपर्यंत सुविधा पोहोचाव्यात, प्रशासन अधिक पारदर्शक व्हावे आणि देशाच्या आर्थिक क्षमतेत वाढ व्हावी, यासाठी सातत्याने प्रयत्न करण्यात आले. त्यामुळे हा कालखंड केवळ राजकीय नेतृत्वाचा नसून जनसहभागातून उभ्या राहिलेल्या विकास मॉडेलचा म्हणूनही पाहिला जातो.

या प्रवासात आणखी एक महत्त्वाचा टप्पा म्हणजे सलग निवडून आलेले पंतप्रधान म्हणून नरेंद्र मोदी यांनी ४३९९ दिवसांचा कार्यकाळ पूर्ण करत पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या विक्रमाला मागे टाकले. प्रत्येक काळाची सामाजिक आणि राजकीय परिस्थिती वेगळी असली तरी आधुनिक लोकशाही व्यवस्थेत जनतेचा पुन्हा पुन्हा मिळालेला विश्वास हे नेतृत्वावरील विश्वासाचे प्रतीक मानले जाते. २०१४ मध्ये सबका साथ, सबका विकास या संकल्पनेने सुरू झालेला प्रवास पुढे सबका विश्वास आणि सबका प्रयास या विचारांपर्यंत विस्तारला.

२०१४, २०१९ आणि २०२४ या तीन लोकसभा निवडणुकांमध्ये मिळालेला जनादेश हा केवळ निवडणूक विजय म्हणून नव्हे, तर स्थिर नेतृत्व आणि विकासाभिमुख धोरणांवरील जनतेच्या विश्वासाचे प्रतिबिंब मानला जातो. सलग तिसऱ्यांदा पंतप्रधानपदाची जबाबदारी स्वीकारत नरेंद्र मोदी यांनी स्वतंत्र भारताच्या राजकीय इतिहासात एक वेगळा टप्पा गाठला. अनेक देश राजकीय अस्थिरतेचा सामना करत असताना भारताने सातत्यपूर्ण नेतृत्वाचा मार्ग स्वीकारल्याचे चित्र या काळात दिसून आले.

गेल्या दशकात भारताच्या अर्थव्यवस्थेने लक्षणीय वाढ नोंदवली असून देश जगातील प्रमुख अर्थव्यवस्थांमध्ये स्थान मिळवण्याच्या दिशेने पुढे सरकला आहे. मेक इन इंडिया आणि आत्मनिर्भर भारत यांसारख्या उपक्रमांनी उत्पादन क्षेत्राला चालना देण्याबरोबरच भारतीय उद्योगांमध्ये आत्मविश्वास निर्माण करण्याचा प्रयत्न केला. संरक्षण क्षेत्रात स्वदेशी उत्पादनाला प्रोत्साहन मिळाल्याने भारतीय बनावटीच्या उपकरणांची मागणीही वाढल्याचे दिसून आले.

अंतर्गत सुरक्षेच्या दृष्टीने नक्षलवादाचा प्रभाव कमी करण्यासाठी विविध पातळ्यांवर प्रयत्न करण्यात आले. अनेक वर्षे विकासापासून वंचित राहिलेल्या भागांमध्ये पायाभूत सुविधा, शिक्षण आणि उद्योग प्रकल्प पोहोचवण्यावर भर देण्यात आला. गडचिरोलीसारख्या जिल्ह्यांमध्ये औद्योगिक आणि शैक्षणिक गुंतवणुकीमुळे विकासाच्या नव्या संधी निर्माण होत असल्याचे चित्र दिसत आहे.

पायाभूत सुविधांच्या क्षेत्रातही मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक करण्यात आली. राष्ट्रीय महामार्गांचे विस्तारित जाळे, ग्रामीण रस्त्यांची उभारणी, रेल्वेचे विद्युतीकरण, वंदे भारतसारख्या आधुनिक रेल्वे सेवा आणि मेट्रो नेटवर्कचा विस्तार यामुळे वाहतूक व्यवस्थेत लक्षणीय बदल झाला. ग्रामीण आणि शहरी भागातील संपर्कक्षमता वाढल्याने आर्थिक आणि सामाजिक व्यवहारांना गती मिळाली.

शेतकरी कल्याणाला केंद्रस्थानी ठेवून विविध योजना राबवण्यात आल्या. प्रधानमंत्री किसान सन्मान निधी, कृषी सिंचन योजना आणि सूक्ष्म सिंचन उपक्रमांमुळे शेती क्षेत्राला मदत करण्याचा प्रयत्न झाला. कृषी उत्पादनवाढ, दुग्धव्यवसायातील प्रगती आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना मिळाल्याचे सांगितले जाते.

सामाजिक कल्याणाच्या क्षेत्रात गरीब कल्याण अन्न योजना, प्रधानमंत्री आवास योजना, उज्ज्वला योजना, आयुष्मान भारत आणि जल जीवन मिशन यांसारख्या योजनांद्वारे कोट्यवधी नागरिकांना विविध सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या. निवारा, आरोग्य, स्वच्छ इंधन आणि पिण्याच्या पाण्यासारख्या मूलभूत गरजांवर विशेष भर देण्यात आला.

महिलांच्या सक्षमीकरणासाठीही अनेक उपक्रम राबवण्यात आले. जनधन खात्यांमध्ये महिलांचा मोठा सहभाग, स्वयं-सहाय्यता गटांना प्रोत्साहन, लखपती दीदी अभियान, सुकन्या समृद्धी योजना आणि विविध सामाजिक सुरक्षा योजनांमुळे महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याचा प्रयत्न करण्यात आला. संरक्षण दलांमध्ये महिलांच्या वाढत्या सहभागामुळे नेतृत्वातील त्यांची भूमिका अधिक बळकट होत असल्याचे दिसते.

डिजिटल परिवर्तन हा या कालखंडातील आणखी एक महत्त्वाचा पैलू ठरला. जनधन, आधार आणि मोबाईल या त्रिसूत्रीच्या माध्यमातून थेट लाभ हस्तांतरणाची व्यवस्था मजबूत करण्यात आली. यूपीआय व्यवहारांमुळे भारताने डिजिटल पेमेंट क्षेत्रात जागतिक स्तरावर वेगळी ओळख निर्माण केली. भारतनेट, डिजिटल गव्हर्नन्स आणि ऑनलाइन प्रशासन प्रणालींमुळे शासन अधिक पारदर्शक आणि कार्यक्षम करण्याचा प्रयत्न झाला.

परराष्ट्र धोरणाच्या पातळीवर भारताने स्वहिताला प्राधान्य देत स्वतंत्र भूमिका कायम ठेवली. विविध जागतिक प्रश्नांवर संतुलित भूमिका मांडत भारताने स्वतःची विश्वासार्ह प्रतिमा निर्माण केली. व्यापार,

गुंतवणूक आणि तंत्रज्ञान सहकार्याच्या माध्यमातून अनेक देशांशी संबंध अधिक दृढ झाले.

उत्पादन आणि उद्योग क्षेत्रात मेक इन इंडिया, स्टार्टअप इंडिया आणि उत्पादनाशी निगडित प्रोत्साहन (PLI) योजनांमुळे इलेक्ट्रॉनिक्स, मोबाईल उत्पादन आणि नवउद्योगांना चालना मिळाली. स्टार्टअप परिसंस्थेच्या विस्तारामुळे नव्या उद्योजकांना संधी उपलब्ध झाली आणि भारत नवकल्पनांच्या केंद्रांपैकी एक म्हणून उदयास येऊ लागला.

सांस्कृतिक वारशाच्या जतन आणि पुनरुज्जीवनावरही या काळात विशेष भर देण्यात आला. अयोध्या राम मंदिर, काशी विश्वनाथ कॉरिडॉर, महाकाल लोक, केदारनाथ पुनर्विकास तसेच राष्ट्रीय महापुरुषांच्या स्मृती जपणाऱ्या विविध प्रकल्पांद्वारे सांस्कृतिक ओळख अधिक दृढ करण्याचा प्रयत्न झाला. नवीन संसद भवन, कर्तव्य पथ आणि राष्ट्रीय स्मारके ही नव्या भारताच्या आत्मविश्वासाची प्रतीके म्हणून पुढे आली.

महाराष्ट्रालाही अनेक मोठ्या पायाभूत प्रकल्पांचा लाभ मिळाला. वाढवण बंदर, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, समृद्धी महामार्ग, अटल सेतू, मुंबई कोस्टल रोड, मेट्रो प्रकल्प आणि इतर विकासकामांमुळे राज्याच्या आर्थिक क्षमतेला नवी दिशा मिळत असल्याचे चित्र दिसते.

आज भारताकडे जग केवळ मोठी बाजारपेठ म्हणून पाहत नाही, तर जागतिक स्तरावर जबाबदार आणि विश्वासार्ह भागीदार म्हणूनही पाहू लागल्याचे अनेक विश्लेषकांचे मत आहे. विकसित भारत २०४७ या संकल्पनेची पायाभरणी म्हणून गेल्या बारा वर्षांच्या या प्रवासाकडे पाहिले जात असून, विश्वास, विकास आणि जनसहभाग यांचा हा प्रवास पुढील काळातही अधिक वेगाने सुरू राहील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

**लेखक - नामदार देवेंद्र फडणवीस**
**मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई**



# टी-20 विश्वचषकासाठी भारताच्या ‘रणरागिणी’ सज्ज
## हरमनप्रीतच्या नेतृत्वाखाली विश्वविजेतेपदाचे स्वप्न

महिला टी-२० विश्वचषक २०२६ स्पर्धेचा थरार आता अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला असून, भारतीय महिला क्रिकेट संघ इतिहास रचण्याच्या निर्धाराने इंग्लंडमध्ये मैदानात उतरणार आहे. १२ जूनपासून सुरू होणाऱ्या या स्पर्धेत जगातील १२ बलाढ्य संघ विजेतेपदासाठी लढणार आहेत. नुकतेच एकदिवसीय विश्वचषकावर नाव कोरणाऱ्या भारतीय संघाकडून आता पहिल्यांदाच टी-२० विश्वचषक जिंकण्याची अपेक्षा देशभरातील क्रिकेटप्रेमी व्यक्त करत आहेत. हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखाली अनुभवी आणि युवा खेळाडूंचा समतोल असलेला भारतीय संघ यंदा विजेतेपदाचा प्रमुख दावेदार मानला जात आहे.

भारताचा समावेश अ गटात झाला असून ऑस्ट्रेलिया, दक्षिण आफ्रिका, पाकिस्तान, बांगलादेश आणि नेदरलँड्स यांसारख्या मजबूत संघांशी त्यांची लढत होणार आहे. स्पर्धेतील सर्वाधिक उत्सुकता असलेला भारत-पाकिस्तान सामना १४ जून रोजी होणार असून, त्यानंतर भारत १७ जूनला नेदरलँड्स, २१ जूनला दक्षिण आफ्रिका, २५ जूनला बांगलादेश आणि २८ जूनला ऑस्ट्रेलियाचा सामना करणार आहे. या पाच साखळी सामन्यांतील कामगिरीवर भारताचा उपांत्य फेरीचा मार्ग निश्चित होणार असल्याने प्रत्येक सामना महत्त्वाचा ठरणार आहे.

यंदाची स्पर्धा अनेक अर्थांनी ऐतिहासिक ठरणार आहे. प्रथमच १२ संघ सहभागी होत असल्याने स्पर्धेतील सामन्यांची संख्या ३३ पर्यंत वाढली आहे. इंग्लंडमधील एजबेस्टन, लॉर्ड्स, द ओव्हल, ओल्ड ट्रॅफर्ड, हेडिंग्ले, हॅम्पशायर बाऊल आणि ब्रिस्टल काउंटी ग्राउंड या सात प्रतिष्ठित मैदानांवर सामने खेळवले जाणार आहेत. ३० जून आणि २ जुलै रोजी उपांत्य सामने, तर ५ जुलै रोजी लॉर्ड्सच्या ऐतिहासिक मैदानावर अंतिम सामना रंगणार आहे.

भारतीय संघाकडे दमदार फलंदाजी, प्रभावी गोलंदाजी आणि उत्कृष्ट क्षेत्ररक्षणाची ताकद आहे. गेल्या काही वर्षांत महिला क्रिकेटमध्ये भारताने सातत्याने उल्लेखनीय प्रगती केली असून जागतिक स्तरावर आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यामुळे यंदा इंग्लंडच्या भूमीवर भारतीय रणरागिणी विजेतेपदाचा चषक उंचावतील, अशी आशा प्रत्येक भारतीय क्रिकेटप्रेमीच्या मनात आहे. आता संपूर्ण देशाच्या नजरा हरमनप्रीत कौर आणि तिच्या संघाच्या ऐतिहासिक कामगिरीकडे लागल्या आहेत. भारतीय महिला क्रिकेट संघाचा सर्वात मोठा आधार म्हणजे कर्णधार हरमनप्रीत कौर हिचा अनुभव आणि आक्रमक नेतृत्व. संघाची उपकर्णधार आणि स्टार सलामीवीर स्मृती मंधाना आपल्या आकर्षक फलंदाजीने कोणत्याही गोलंदाजी आक्रमणाला आव्हान देण्याची क्षमता ठेवते. तिच्यासोबत शेफाली वर्माची स्फोटक सुरुवात भारतासाठी मोठी ताकद ठरू शकते. मधल्या फळीत जेमिमा रॉड्रिग्ज आणि ऋचा घोष यांच्यावर धावांचा डाव उभारण्याची तसेच अखेरच्या षटकांमध्ये वेगाने धावा करण्याची जबाबदारी असेल. अष्टपैलू दीप्ती शर्मा फलंदाजी आणि गोलंदाजी या दोन्ही विभागांत संघासाठी महत्त्वाची भूमिका बजावते, तर स्नेह राणा आणि राधा यादव या फिरकी गोलंदाज प्रतिस्पर्धी फलंदाजांना अडचणीत आणू शकतात. वेगवान गोलंदाजीची धुरा रेणुका सिंह ठाकूर सांभाळणार असून तिच्या स्विंग गोलंदाजीवर भारताला मोठ्या अपेक्षा आहेत. मुख्य प्रशिक्षक अमोल मुझुमदार यांच्या मार्गदर्शनाखाली अनुभव आणि युवा जोशाचा उत्कृष्ट संगम असलेला भारतीय संघ यंदाच्या महिला टी-२० विश्वचषकात विजेतेपदासाठी प्रबळ दावेदार मानला जात आहे.



संगमनेरकरांनी गौरविलेले
॥जय श्रीराम॥
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०

धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
We treat He cure's
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा
मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०



# डॉ. गणेश राजदेव यांना पीएच.डी.पदवी



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर -सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात कला वाणिज्य विज्ञान महाविद्यालयातील निवृत्त इतिहास विभाग प्रमुख प्रा. डॉ. त्रिंबक राजदेव यांचे चिरंजीव डॉ. गणेश त्रिंबक राजदेव यांनी इतिहास विषयामध्ये यशस्वी संशोधन पूर्ण केल्याबद्दल सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने त्यांना पीएच.डी. पदवी प्रदान केली आहे.


डॉ. गणेश राजदेव हे संगमनेर येथील रहिवासी असून त्यांनी इंग्रजी विषयांमध्ये पदवी मिळवली आहे. याचबरोबर इतिहास विषयांमध्ये पदवीत्तर अभ्यासक्रम पूर्ण करून बीएड पूर्ण केले आहे. संगमनेर नगरपालिका १६० वर्षापूर्वीची ऐतिहासिक असून संगमनेर नगरपरिषद : एक ऐतिहासिक अभ्यास (इ. स. १८६० ते २०११) या विषयावर आधारित त्यांनी संशोधन केले आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठा अंतर्गत पूर्ण केले.

त्यांच्या संशोधन कार्याला मार्गदर्शक डॉ. दिगंबर सोनवणे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. संशोधनादरम्यान त्यांनी विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय नियतकालिकांमध्ये संशोधन लेख प्रकाशित केले आहेत.

संगमनेरच्या साहित्य संशोधन या विषयाबरोबर इतिहास संशोधन मंडळात देखील ते कार्यरत आहेत. डॉ. त्रिंबक राजदेव यांच्या सामाजिक व ऐतिहासिक कामाचा आदर्श घेऊन त्यांनी या विषयात संशोधन केले आहे. त्यांच्या या यशाबद्दल महाराष्ट्राचे माजी शिक्षण मंत्री लोकनेते बाळासाहेब थोरात, मा. आ. डॉ.सुधीर तांबे, आमदार सत्यजित तांबे, सौ दुर्गाताई तांबे, कॅन्सरतज्ञ डॉ.जयश्रीताई थोरात , नगराध्यक्ष डॉ. मैथिलीताई तांबे, प्रा डॉ. त्रिंबक राजदेव, प्राचार्य ज्ञानेश्वर गोंटे, शांताराम डोंगरे, तसेच राजदेव कुटुंबीय, मित्रपरिवार, सहकारी तसेच शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

# तुकाराम मुंढेंची भेसळखोरांवर धडाका मोहीम

## शिर्डीत पेढे विक्रेत्यांवर एफडीएची छापेमारी



युवावार्ता (प्रतिनिधी)

शिर्डी - अन्न व औषध प्रशासनाच्या आयुक्तपदाचा पदभार स्वीकारल्यानंतर सनदी अधिकारी तुकाराम मुंढे यांनी राज्यभरात भेसळखोरांविरोधात धडक कारवाया सुरू केली असल्याने या झंझावाताचे लोण आता शिर्डीत पोहचले आहे. स्थानिक अधिकारी शांत असताना आता त्याच अधिकार्यांनी छापेमारी सुरू केल्याने भेसळखोरांचे धाबे दणाणले आहेत.

शिर्डीत साईबाबांच्या दर्शनासाठी देश-विदेशातून येणार्या लाखो भाविकांच्या श्रद्धेशी आणि आरोग्याशी थेट खेळ सुरू असल्याच्या तक्रारी समोर आल्यानंतर अन्न व औषध प्रशासन यंत्रणा खडबडून जागी झाली आहे. शिर्डी शहर व परिसरात प्रसाद म्हणून सर्रास विकल्या जाणार्या पेढ्यांच्या गुणवत्तेबाबत गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, प्रशासनाच्या विशेष पथकाने शिर्डीत दाखल होत नमुने संकलन मोहीम युद्धपातळीवर सुरू केली आहे. या कारवाईमुळे शिर्डीतील भेसळखोर आणि नियमबाह्य व्यवसाय करणार्या प्रसाद विक्रेत्यांचे धाबे दणाणले आहेत.

शिर्डीतील अनेक दुकानांमध्ये विकल्या जाणार्या पेढ्यांच्या बॉक्सवर उत्पादकाचे नाव, उत्पादनाची तारीख, बॅच नंबर तसेच मुदत समाप्तीची कोणतीही माहिती स्पष्टपणे नमूद केली जात नसल्याच्या तक्रारी भाविकांकडून सातत्याने येत होत्या. काही ठिकाणी तर पेढ्यांचा दर्जा अत्यंत निकृष्ट असल्याचे समोर आले होते. या पार्श्वभूमीवर एफडीएच्या छापा पथकाने विविध दुकानांवर अचानक धाडी टाकून पेढ्यांचे नमूने गोळा केले आहेत. हे सर्व नमुने नियमानुसार सील करण्यात आले असून ते तातडीने प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठवले जाणार आहेत. प्रयोगशाळेचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर दोषी आढळणार्या विक्रेत्यांवर थेट गुन्हे दाखल करून कडक कायदेशीर कारवाई केली जाईल, अशी माहिती अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकार्यांनी दिली आहे.

पेढ्यांच्या या कारवाईनंतर आता शिर्डीतील हॉटेल, रेस्टॉरंट आणि उपहारगृहांमध्ये वापरला जाणारा खवा, पनीर, दूध आणि तूप या दुग्धजन्य पदार्थांचीही सखोल तपासणी होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. एवढेच नव्हे तर, साईबाबा संस्थानच्या वतीने भाविकांना मिळणार्या अधिकृत लाडू प्रसादासाठी वापरल्या जाणार्या तुपाचा दर्जा देखील अन्न व औषध प्रशासनाने तपासून घ्यावा, अशी जोरदार चर्चा आता शिर्डीतील ग्रामस्थ आणि साईभक्तांमध्ये सुरू झाली आहे. शिर्डीची जागतिक ओळख आणि प्रतिष्ठा जपण्यासाठी अन्नसुरक्षा नियमांचे काटेकोर पालन होणे अत्यंत गरजेचे आहे. भाविकांच्या आरोग्याचा विचार करून प्रशासनाने ही मोहीम केवळ पेढ्यांपुरती मर्यादित न ठेवता शहरातील संपूर्ण खाद्यपदार्थ विक्री केंद्रांची व्यापक तपासणी करावी, अशी मागणी आता साईनगरीत जोर धरू लागली आहे.

# धनादेश अनादर प्रकरणांसाठी 18 जुलै रोजी विशेष लोकअदालत

जिल्हा माहिती कार्यालय-

अहिल्यानगर - धनादेश अनादर (चेक बाऊन्स) आणि दाखलपूर्व प्रकरणांचा सामंजस्याने निपटारा करण्यासाठी जिल्ह्यात १८ जुलै २०२६ रोजी विशेष लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्ह्यातील सर्व न्यायालयांमध्ये हा उपक्रम राबविण्यात येणार असून संबंधित पक्षकार, बँका, वित्तीय संस्था तसेच विधिज्ञांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे व या विशेष संधीचा लाभ घेऊन तडजोडीद्वारे वाद मिटवावेत, असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव योगेश पैठणकर यांनी केले आहे. राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, नवी दिल्ली तसेच महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या निर्देशानुसार आणि प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण श्री. एस. बी. कचरे यांच्या मार्गदर्शनाखाली या विशेष लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले आहे.

लोकअदालतीमध्ये निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट्स ॲक्टच्या कलम १३८ अंतर्गत न्यायालयात प्रलंबित असलेली धनादेश अनादराची प्रकरणे तसेच त्यासंदर्भातील दाखलपूर्व प्रकरणे सामंजस्याने निकाली काढण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. या प्रक्रियेमुळे संबंधित पक्षकारांचा वेळ, पैसा आणि श्रम यांची मोठ्या प्रमाणात बचत होईल. प्रलंबित प्रकरणे लोकअदालतीत ठेवण्यासाठी संबंधित पक्षकारांनी आपले प्रकरण ज्या न्यायालयात सुरू आहे तेथे अर्ज सादर करावेत. तसेच दाखलपूर्व प्रकरणांसाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण किंवा संबंधित तालुका विधी सेवा समितीकडे अर्ज करावेत असेही कळविण्यात आले आहे.

# कल्पित वाकचौरे यांचा संविधान पुरस्काराने गौरव

युवावार्ता (प्रतिनिधी)



अकोले- अल्प कालावधित उद्योग क्षेत्रात उल्लेखनिय कामगिरी केल्यामुळे युवा उद्योजक कल्पित विजय वाकचौरे यांना तेजस प्रतिष्ठाणच्या वतीने सन्मानित करण्यात आले. हा कार्यक्रम मालपाणी लॉन्स संगमनेर येथे नुकताच पार पडला. यावेळी महा. राज्याचे महसुलमंत्री बाळासाहेब थोरात यांनी कल्पित वाकचौरे यांचे कौतुक केले. आत्ता निटचे पेपर फुटत आहेत त्यामुळे गोर गरिबांची मुले नोकरीत लागतील अशी परिस्थिती नाही. त्यामुळे तरुणांनी उद्योग व्यावसायात आपले पाय रोवले पाहिजे असे म्हणत थोरातांनी सरकारला टोला देत तरुणांना आवाहन केले. कल्पित हे सध्या फक्त महाराष्ट्र व भारतापुरते मर्यादीत राहिले नसून परदेशात देखील त्यांनी चांगले पाय रोवले आहेत. शेकडो तरुणांना रोजगार मिळेल अशी गुंतवणुक त्यांनी केली असून आता अकोले संगमनेर सारख्या ठिकाणी मोठे प्रोजेक्ट सुरु झाले आहेत. त्यांच्या माध्यमातून निश्चित नव्या पिढाला दिशा आणि प्रेरणा मिळेल अशी मला खात्री आहे असे गौरव उद्गार थोरात यांनी काढले. यावेळी व्यासपिठावर अकोले तालुक्याचे आमदार आ. डॉ. किरण लहामटे, रिपाईचे राज्य सचिव विजयराव वाकचौरे, तेजस फाऊंडेशनचे अध्यक्ष डॉ. रविंद्र घोसाळे उपस्थित होते. तर कार्यक्रमाचे अध्यक्ष ड. संघराज रुपवते होते.

कल्पित वाकचौरे यांनी आई वडिलांचे नाव डोळ्यासमोर ठेवून सहा वर्षापुर्वी विराजश्री कंपनीची स्थापना केली होती. त्या माध्यमातून त्यांनी पुण्यात आईस्क्रिम पार्लरसह छोटे मोठे उद्योग सुरु केले होते. त्यात त्यांना चांगले यश आले. विजयराव वाकचौरे यांच्या चळवळीतील बड्यो लोकांच्या ओळखी आणि केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांच्या सहवासात राहून विविध उद्योगांना त्यांनी समजून घेतले. ते उभे करण्यासाठी कोट्यावधी रुपयांचे भांडवल लागते. त्याची तजबिज करुन फुड प्रोसेसिंग, मिल्क प्रोडक्ट, लॅण्ड डेव्हलपमेंट, कन्सल्टिंग, शेती, ग्रामीण भागातील मागासवर्गीयांसाठी शिक्षण अशी विविध क्षेत्रात त्यांनी स्वत:च्या नावाचा ठसा उमटविला आहे. पुणे, मुंबई, नाशिक, अकोले, संगमनेर, कोकण, श्रीगोंदा यांसह महाराष्ट्रात विविध ठिकाणी त्यांचे प्रोजेक्ट सुरु आहेत. हा विस्तार केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर आता दुबई, अमेरीका व आणि अन्य ठिकाणी देखील सुरु होत आहेत. त्यामुळे, एका मागासवर्गीय आणि गरिब कुटुंबातून पुढे आलेला अवघ्या तिशीतील तरुण इतकी उतुंग भरारी घेतोय, ही अकोले आणि संगमनेरसाठी अभिमानाची बाब आहे.

कल्पित वाकचौरे यांनी केवळ उद्योग व्यावसाय म्हणून नाव कमविले असेच नव्हे तर अनाथ मुलांना मदत करणे, शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य पुरविणे, गरजू विद्यार्थ्यांच्या फि भरणे, अन्नदान करणे, तरुणांना प्रेरणा मिळावी म्हणून विविध ठिकाणी आर्थिक मदत करणे, बक्षिसे देणे, शिव-फुले-शाहु-आंबेडकर चळवळीत योगदान देणे अशा विविध गोष्टींतून त्यांनी समाजिक काम केले आहे. त्यामुळे, त्यांना संविधान पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. सध्या केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी कल्पित वाकचौरे यांच्यावर महाराष्ट्राच्या उद्योग आघाडीचे अध्यक्षपद सोपविले असून संपुर्ण महाराष्ट्रात त्यांचे जोरदार काम सुरु आहे. त्यामुळे त्यांच्या कार्यांचे सर्वत्र कौतुक होते असून विविध क्षेत्रातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होते आहे.

# सीमेवरील स्फोटात दोन वीर जवानांचा मृत्यू

श्रीनगर (वृत्तसंस्था)

जम्मू-काश्मीरमधील उरी सेक्टरमध्ये नियंत्रण रेषेजवळ झालेल्या एका भीषण आणि अचानक झालेल्या स्फोटात भारतीय लष्कराचे दोन जवान शहीद झाले आहेत. देशासाठी सर्वोच्च बलिदान देणारे हे दोन्ही वीर जवान महाराष्ट्राचे सुपुत्र होते. मंगळवारी उशिरा संध्याकाळी उरी येथील कमलकोट भागात नियंत्रण रेषेजवळ गस्त घालत असताना हा स्फोट झाला. या घटनेमुळे संपूर्ण देशासह महाराष्ट्रावर शोककळा पसरली असून, वीर जवानांच्या गावी अत्यंत दु:ख व्यक्त केले जात आहे. महाराष्ट्राचे दोन सुपुत्र हुतात्माया स्फोटात वीरमरण आलेल्या दोन्ही जवानांची ओळख पटली असून, वीर जवान विक्रम चव्हाण हे ऐरोली (नवी मुंबई) येथील रहिवासी होते. तर वीर जवान अर्जुन जाधव हे महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्यातील कराड तालुक्यातील शाहपूर गावचे रहिवासी होते. मंगळवारी संध्याकाळी कमलकोट येथे झालेल्या या अचानक स्फोटात दोन्ही जवान गंभीररित्या जखमी झाले होते.

# जिल्ह्यात १७ जूनपर्यंत शस्त्र व जमावबंदी आदेश लागू

युवावार्ता (प्रतिनिधी) अहिल्यानगर - जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी अपर जिल्हा दंडाधिकारी दादासाहेब गिते यांनी मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ च्या कलम ३७(१) (३) अन्वये १७ जून २०२६ रोजी रात्री १२ वाजेपर्यंत संपूर्ण जिल्ह्यात शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश लागू केले आहेत. धार्मिक कार्यक्रम, लग्नसमारंभ, मिरवणुका व प्रेतयात्रांतील जमावास या आदेशातून सूट देण्यात आली आहे. तसेच पोलीस अधिकारी, कर्तव्यावर असलेले शासकीय अधिकारी व कर्मचारी तसेच सभा अथवा मिरवणुकीसाठी विधिवत परवानगी घेतलेल्या व्यक्तींनाही या आदेशातून वगळण्यात आले आहे. या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचेही आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे.

# महाराष्ट्रात मान्सूनचा जोर वाढण्याची शक्यता

मुंबई (वृत्तसंस्था)

राज्यातील नागरिकांना उकाडा आणि वाढत्या आर्द्रतेपासूनलवकरच दिलासा मिळण्याची शक्यता आहे. भारतीय हवामान विभागाने महाराष्ट्रातील तब्बल ३० जिल्ह्यांसाठी येलो अलर्ट जारी केला असून पुढील काही दिवस मेघगर्जनेसह पाऊस कोसळण्याचा अंदाज वर्तवला आहे. मुंबई, ठाणे, पुणे आणि कोकणासह राज्यातील अनेक भागांमध्ये वादळी वाऱ्यांसह पावसाची शक्यता आहे.

आयएमडीने महाराष्ट्रातील ३० जिल्ह्यांसाठी येलो अलर्ट जारी केला आहे. यामध्ये मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, नाशिक, अहमदनगर, धुळे, नंदुरबार, बीड, परभणी, लातूर, धाराशिव, नांदेड, हिंगोली, अकोला, अमरावती, नागपूर, चंद्रपूर, भंडारा, गोंदिया, वर्धा, वाशीम आणि यवतमाळ जिल्ह्यांचा समावेश आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार या भागांमध्ये ४० ते ५० किमी प्रतितास वेगाने वादळी वारे वाहू शकतात. तसेच विजांच्या कडकडाटासह मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता आहे.हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, १० ते १३ जूनदरम्यान मुंबई, ठाणे आणि पुणे परिसरात हलका ते मध्यम पाऊस सुरू राहू शकतो. सातारा आणि कोल्हापूरमध्ये मान्सून अधिक सक्रिय होण्याची शक्यता असून काही भागांत मुसळधार पाऊस होऊ शकतो. नाशिक आणि अहमदनगरमध्येही विजांच्या कडकडाटासह पावसाळी वातावरण राहण्याचा अंदाज आहे. तर मराठवाडा आणि विदर्भातील काही भागांमध्ये हलक्या सरी कोसळू शकतात. या भागांमध्ये तापमान ४० अंश सेल्सिअसच्या पुढे राहू शकते, असा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. राज्यात मान्सूनपूर्व हालचाली वाढल्या असल्या तरी शेतकऱ्यांनी खरीप पेरणी करण्याची घाई करू नये, असा सल्ला कृषी तज्ज्ञांनी दिला आहे. सर्वत्र समाधानकारक आणि सलग पाऊस झाल्यानंतरच पेरणीला सुरुवात करावी, असे तज्ज्ञांचे मत आहे.

# गगनगिरी महाराज सप्ताहानिमित्त महाप्रसादासाठी चपाती-भाकरी संकलनास उत्स्फूर्त प्रतिसाद




युवावार्ता (प्रतिनिधी)

चणेगाव - प. पू. श्री स्वामी गगनगिरी महाराज यांच्या अखंड हरिनाम सप्ताहानिमित्त आयोजित महाप्रसादासाठी चणेगाव येथे चपाती व भाकरी संकलन उपक्रम उत्साहात पार पडला. श्री मारुती मंदिर, चणेगाव येथे आयोजित या उपक्रमास ग्रामस्थांनी मोठ्या प्रमाणात प्रतिसाद देत उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. महाप्रसादासाठी आवश्यक असलेल्या चपाती व भाकरीचे संकलन सकाळी करण्यात आले. या सेवाकार्यात गावातील ज्येष्ठ नागरिक, महिला, युवक तसेच विविध सामाजिक कार्यकर्त्यांनी सक्रिय सहभाग घेतला. ग्रामस्थांनी श्रद्धा आणि सेवाभाव जपत मोठ्या प्रमाणावर चपाती व भाकरी अर्पण केल्या. गावातील सर्व समाजघटकांच्या एकोप्यामुळे आणि सामूहिक सहभागामुळे हा उपक्रम यशस्वीरीत्या पार पडला. या प्रसंगी उपस्थित सामाजिक कार्यकर्त्यांनी धर्मकार्य, अन्नदान आणि समाजातील एकात्मता वाढविण्यासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले. चणेगाव ग्रामस्थांनी दाखविलेल्या उत्स्फूर्त प्रतिसादाबद्दल सप्ताह समितीने सर्वांचे आभार मानले.

# जिजामाता इंग्लिश मीडियम स्कूलच्या विद्यार्थ्याचे सायकलिंग स्पर्धेत यश

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - 'जागतिक सायकल दिना' निमित्त 'श्रीरामपूर सायकलिंग क्लब' च्या वतीने दि. ७ जून रोजी आयोजित करण्यात आलेल्या सायकलिंग स्पर्धेत 'जिजामाता इंग्लिश मीडियम स्कूल, संगमनेर' येथील इयत्ता सातवीचा विद्यार्थी 'अर्णव अमित कुलकर्णी' याने उल्लेखनीय यश संपादन केले.

या स्पर्धेमध्ये अर्णवने श्रीरामपूर ते पढेगाव आणि पुन्हा श्रीरामपूर असा एकूण २५ किलोमीटरचा सायकल प्रवास यशस्वीरित्या पूर्ण केला. त्याच्या या उत्कृष्ट कामगिरीबद्दल आयोजकांच्या वतीने त्याला पदक देऊन गौरविण्यात आले. अर्णवच्या या यशामागे त्याची जिद्द, शिस्त, नियमित सराव आणि शारीरिक तंदुरुस्ती यांचा मोठा वाटा आहे. कमी वयात इतक्या मोठ्या अंतराचे सायकलिंग पूर्ण करून त्याने साहस, चिकाटी आणि आत्मविश्वासाचे उत्तम उदाहरण विद्यार्थ्यांसमोर ठेवले आहे.

जिजामाता इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर दिला जात असून शारीरिक तंदुरुस्ती, क्रीडा संस्कृती आणि पर्यावरणपूरक जीवनशैलीचा अंगीकार करण्यासाठी विविध उपक्रम राबविले जातात. सायकलिंगसारख्या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये आरोग्याबाबत जागरूकता निर्माण होण्यास मदत होते.

अर्णवच्या या यशाबद्दल शाळेच्या संस्थापक अध्यक्ष, प्राचार्या, उपप्राचार्या तसेच शिक्षकवृंद यांनी त्याचे अभिनंदन करून भविष्यातही अशाच प्रकारे विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करण्यासाठी शुभेच्छा दिल्या.



# संपादकीय...

## आंतरराष्ट्रीय खेळ दिनानिमित्ताने

# बालपण, आरोग्य आणि आनंदाचा उत्सव

११ जून रोजी जगभरात 'आंतरराष्ट्रीय खेळ दिन' साजरा केला जातो. संयुक्त राष्ट्रसंघाच्या महासभेने २०२४ मध्ये या दिवसाला अधिकृत मान्यता देत खेळाच्या माध्यमातून बालकांच्या सर्वांगीण विकासाचे महत्त्व अधोरेखित केले. खेळ ही केवळ करमणुकीची गोष्ट नसून बालकांच्या शारीरिक, मानसिक, भावनिक आणि सामाजिक विकासाची मूलभूत गरज आहे. आजच्या तंत्रज्ञानप्रधान आणि स्पर्धात्मक युगात खेळाचे महत्त्व अधिकच वाढले आहे. बालकांच्या जीवनातील आनंद, सर्जनशीलता, आत्मविश्वास आणि सामाजिक जाणीवा विकसित करण्यासाठी खेळ आवश्यक आहे. संयुक्त राष्ट्रसंघाच्या बालहक्क करारानुसार प्रत्येक बालकाला खेळण्याचा आणि मनोरंजनाचा अधिकार आहे. मात्र, जगातील अनेक मुले गरिबी, बालमजुरी, सुरक्षित खेळाच्या जागांचा अभाव, शैक्षणिक असमानता आणि सामाजिक अडथळ्यांमुळे या हक्कापासून वंचित राहतात. वाढते शहरीकरण आणि डिजिटल साधनांचा वाढता वापर यामुळे मुलांच्या मैदानी खेळण्याच्या संधी कमी होत आहेत. अशा परिस्थितीत आंतरराष्ट्रीय खेळ दिन समाजाला खेळाच्या हक्काची जाणीव करून देतो आणि प्रत्येक बालकाला सुरक्षित व सर्वसमावेशक वातावरण उपलब्ध करून देण्याचे आवाहन करतो.

बालकांच्या शारीरिक विकासासाठी खेळ अत्यंत आवश्यक आहे. धावणे, उड्या मारणे, सायकल चालविणे, पोहणे आणि विविध मैदानी खेळांमुळे शरीर सुदृढ राहते. स्नायू बळकट होतात, शरीरातील समन्वय वाढतो आणि आरोग्य चांगले राहते. नियमित खेळामुळे लठ्ठपणा, मधुमेह आणि इतर जीवनशैलीजन्य आजारांचा धोका कमी होतो. आज अनेक मुले मोबाइल, संगणक आणि दूरदर्शनसमोर तासन्तास वेळ घालवत असल्याने शारीरिक हालचाली कमी होत आहेत. त्यामुळे आरोग्याशी संबंधित विविध समस्या निर्माण होत आहेत. अशा वेळी मुलांना मैदानी खेळांकडे वळविणे आवश्यक ठरते. खेळ मानसिक आरोग्यासाठीही अत्यंत उपयुक्त आहे. खेळामुळे मुलांमध्ये आनंद आणि उत्साह निर्माण होतो. खेळताना त्यांची विचारशक्ती, निर्णयक्षमता आणि समस्या सोडविण्याची क्षमता विकसित होते. विजयाचा आनंद आणि पराभवाचा स्वीकार या दोन्ही अनुभवांमधून मानसिक स्थैर्य वाढते. सध्याच्या काळात अनेक मुले अभ्यासाचा ताण, स्पर्धेचे दडपण आणि सामाजिक अपेक्षांमुळे मानसिक तणावाचा सामना करतात. अशा परिस्थितीत खेळ हा तणावमुक्तीचा प्रभावी मार्ग ठरतो. आत्मविश्वास वाढवून जीवनातील आव्हानांना सामोरे जाण्याची ताकद खेळातून मिळते. भावनिक विकासातही खेळाची भूमिका महत्त्वाची आहे. खेळ मुलांना आपल्या भावना व्यक्त करण्यासाठी नैसर्गिक व्यासपीठ उपलब्ध करून देतो. विविध परिस्थितींचा सामना करताना संयम, आत्मनियंत्रण आणि सहनशीलता विकसित होते. संघात खेळताना इतरांशी जुळवून घेण्याची आणि सहकार्याची भावना निर्माण होते. परस्पर आदर, सामूहिक जबाबदारी आणि इतरांच्या भावनांची जाणीव यांसारखे गुण खेळातून विकसित होतात. त्यामुळे भावनिक परिपक्वता वाढण्यास मदत होते. सामाजिक विकासाच्या दृष्टीने खेळ हा प्रभावी माध्यम आहे. खेळ विविध पार्श्वभूमीच्या व्यक्तींना एकत्र आणतो. मैदानावर जात, धर्म, भाषा किंवा आर्थिक स्थितीपेक्षा खेळाडू म्हणून प्रत्येकाची ओळख महत्त्वाची ठरते. संघभावना, नेतृत्व, शिस्त आणि परस्पर आदर यांसारखी मूल्ये खेळातून रुजतात. समाजातील विविध घटकांमध्ये एकात्मता आणि बंधुभाव निर्माण करण्याची ताकद खेळामध्ये आहे. भारतीय संस्कृतीमध्ये खेळांना प्राचीन परंपरा लाभली आहे. कबड्डी, खो-खो, कुस्ती, विटीदांडू आणि मल्लखांब यांसारख्या पारंपरिक खेळांनी अनेक पिढ्यांचे बालपण समृद्ध केले आहे. हे खेळ शारीरिक तंदुरुस्तीबरोबरच धैर्य, चपळता आणि सामूहिक सहभागाची भावना विकसित करतात. मात्र, आधुनिक जीवनशैली आणि मोकळ्या जागांचा अभाव यामुळे या खेळांचे प्रमाण घटत आहे. त्यामुळे पारंपरिक खेळांचे जतन आणि संवर्धन करणे आवश्यक झाले आहे. तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे डिजिटल खेळांचा प्रसार मोठ्या प्रमाणात झाला आहे. काही डिजिटल खेळ ज्ञानवृद्धीसाठी उपयुक्त असले तरी त्यांचा अतिरेक आरोग्यावर विपरीत परिणाम करू शकतो. स्क्रीनसमोर अधिक वेळ घालवल्यामुळे डोळ्यांचे विकार, झोपेच्या समस्या, एकाग्रतेचा अभाव आणि सामाजिक संवादात घट यांसारख्या समस्या निर्माण होतात. त्यामुळे तंत्रज्ञानाचा संतुलित वापर करून मुलांना मैदानी खेळांसाठी प्रोत्साहित करणे गरजेचे आहे.

# काढणीपश्चात पायाभूत सुविधा व पॅकेजिंग युनिटसाठी अर्ज करण्याचे आवाहन

युवावार्ता (प्रतिनिधी) -

अहिल्यानगर- सन २०२६-२७ च्या कडधान्य आत्मनिर्भरता अभियान योजनेंतर्गत कडधान्य पिकांच्या मूल्यवर्धनाला चालना देऊन शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्याच्या उद्देशाने काढणीपश्चात पायाभूत सुविधा बळकट करण्यासाठी कडधान्य प्रक्रिया व पॅकेजिंग युनिट्स या घटकासाठी अर्थसहाय्य देण्यात येणार आहे. शेतकरी उत्पादक संघ, शेतकरी उत्पादक कंपनी, प्राथमिक कृषी पतसंस्था तसेच इच्छुक वैयक्तिक लाभार्थ्यांनी दि. २१ जून २०२६ पर्यंत संबंधित तालुका कृषी अधिकारी कार्यालयात आवश्यक कागदपत्रांसह अर्ज सादर करावेत, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे यांनी केले आहे.

या योजनेंतर्गत कडधान्य प्रक्रिया व पॅकेजिंग युनिटसाठी प्रत्यक्ष प्रकल्प खर्चाच्या ३३ टक्के किंवा २५ लाख रुपये, यापैकी जी रक्कम कमी असेल त्या मर्यादेत अनुदान देण्यात येणार आहे. अहिल्यानगर जिल्ह्यासाठी या घटकांतर्गत ३ युनिट्सचे भौतिक लक्ष्य निश्चित करण्यात आले आहे.

ही योजना बँक कर्जाशी निगडित असल्याने केंद्र शासनाच्या ग्रामीण भंडारण योजना मार्गदर्शक सूचनांनुसार राष्ट्रीयकृत बँकेकडे प्रस्ताव सादर करणे आवश्यक राहणार आहे. राष्ट्रीयकृत बँकेकडून कर्ज मंजूर झाल्यानंतर संबंधित अर्जदार, पतसंस्था, शेतकरी उत्पादक कंपनी अथवा संघ यांना या योजनेचा लाभ घेता येईल.

शेतकरी उत्पादक संघ, प्राथमिक कृषी पतसंस्था व शेतकरी उत्पादक कंपनी यांनी मागील दोन वर्षांचे लेखापरीक्षण (ऑडिट) अहवाल, नोंदणी प्रमाणपत्र, ७/१२ व ८-अ उतारे सादर करणे आवश्यक आहे. वैयक्तिक अर्जदारांसाठी ७/१२ व ८-अ उतारे आवश्यक असून अर्जदाराचे वय किमान २१ वर्षे पूर्ण असणे बंधनकारक आहे.

एका कुटुंबातील पती, पत्नी व अविवाहित मुलांपैकी केवळ एका व्यक्तीस आर्थिक सहाय्य मंजूर करण्यात येणार आहे. तसेच प्रकल्प खर्चाच्या किमान १५ टक्के रक्कम तसेच कार्यभांडवलासाठी आवश्यक मार्जिन मनी उभारण्याची आर्थिक क्षमता अर्जदाराकडे असणे आवश्यक असल्याचे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी श्री. बोराळे यांनी स्पष्ट केले आहे.

# पावसाळ्यापूर्वी ...

पान १ वरून -

परिणामी मुसळधार पावसाच्या वेळी गटारी तुंबून पाणी रस्त्यावर आणि दुकानांमध्ये शिरण्याच्या घटना घडतात. त्यामुळे व्यापाऱ्यांचे आर्थिक नुकसान होत असून नागरिकांनाही मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागते. याच पार्श्वभूमीवर नगरपालिकेने संभाव्य पूरस्थिती टाळण्यासाठी गटारीतील गाळ, प्लास्टिक कचरा व इतर अडथळे हटविण्याचे काम सुरू केले आहे. तसेच ज्या ठिकाणी गटारींची दुरवस्था झाली आहे, त्या ठिकाणी आवश्यक दुरुस्तीही करण्यात येत आहे. या कामामुळे पावसाळ्यात पाण्याचा निचरा सुरळीत होण्यास मदत होणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. नगरसेवक गणेश गुंजाळ यांनी सांगितले की, नागरिक व व्यापाऱ्यांच्या सातत्याने येणाऱ्या तक्रारींची दखल घेऊन ही कामे हाती घेण्यात आली आहेत. पावसाळा संपल्यानंतर नवीन नगर रोडचे डांबरीकरण तसेच गटारीवरील खराब झालेल्या भागांवर पॅचवर्क करण्याचे नियोजनही करण्यात आले आहे. त्यामुळे या महत्त्वाच्या मार्गाचा चेहरामोहरा बदलण्यास मदत होणार आहे.

दरम्यान, गटारींमध्ये कचरा टाकू नये, स्वच्छता राखण्यासाठी नागरिकांनी सहकार्य करावे आणि पावसाळ्यातील संभाव्य अडचणी टाळण्यासाठी प्रशासनाला साथ द्यावी, असे आवाहनही नगरपालिकेकडून करण्यात आले आहे. नवीन नगर रोडवरील सुरू असलेल्या या कामांमुळे परिसरातील नागरिक आणि व्यावसायिकांमध्ये समाधान व्यक्त केले जात आहे.





अमोल रहाणे

पीआरओ, चतर हॉस्पिटल

शुभेच्छुक -

दैनिक युवावार्ता परिवर्तनाचा पुरस्कर्ता


## दाखला


दाखला देण्यात येतो की, पायल राजु आरसुळे, मु. पो. अभंगमळा, ता. संगमनेर, जि. अ.नगर यांचे गोगानाथबाबा नर्सिंग स्कूलचे सन-२०१९-२० चे सर्टिफिकेट रजि नं. XI १८६५६ हे दि. २२/०५/२०२५ रोजी संगमनेर शहर बसस्थानक परिसरातून गहाळ झाल आहे. सदर कागदपत्र बसस्थानक संगमनेर येथ शोध घेतला असता ते मिळून आले नाही. सबब हा दाखला देण्यात येत आहे.

पोलीस निरीक्षक
संगमनेर शहर पो. स्टे.
२५/०५/२०२६

# 'शब्द सुमनांजली' डिजिटल चित्रमय काव्यसंग्रहाचा ऑनलाईन प्रकाशन सोहळा

युवावार्ता (प्रतिनिधी)

साहित्याच्या क्षेत्रात एक नवा आदर्श निर्माण करत 'कवी व लेखक' सुदाम नारायण साळुंके (साहित्य सुधाकर) यांच्या 'शैक्षणिक दीपस्तंभ' आणि 'अक्षरधन पब्लिकेशन' (खडकवाडी, पारनेर) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'शब्द सुमनांजली' या पहिल्यावहिल्या डिजिटल चित्रमय काव्यसंग्रहाचा ऑनलाईन प्रकाशन व उत्कृष्ट कवितांचा बक्षीस वितरण सोहळा शनिवार, ६ जून २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता अत्यंत दिमाखदार पद्धतीने संपन्न झाला. गुगल मीट च्या माध्यमातून झालेल्या या अनोख्या सोहळ्यात महाराष्ट्रातील ७७ प्रतिभावान कवी-कवयित्रींच्या काव्यप्रतिभेचा गौरव करण्यात आला असून, या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.




या संपूर्ण सोहळ्याचे अचूक नियोजन आणि संग्रहाची कला-तांत्रिक बाजू मुख्य संपादक सुदाम साळुंके यांनी सांभाळली, तर कार्यकारी संपादक नवनाथ सूर्यवंशी यांनी गुगल मीटचे तांत्रिक संयोजन चोख पार पाडले. या सोहळ्याला प्रमुख अतिथी व मार्गदर्शक म्हणून रामदास पुजारी (सेवानिवृत्त सहाय्यक वनसंरक्षक, पुणे),संदीप वाघोले (कवी व साहित्यिक, जुन्नर), चांगदेव गवळी (शिक्षण विस्ताराधिकारी, पारनेर), साहेबराव शिंदे (सेवानिवृत्त केंद्रप्रमुख, आंबेगाव) आणि नागेश हुलवळे (संपादक, वर्ल्ड व्हिजन टाईम्स) यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुंदर व प्रभावी सूत्रसंचालन आणि शेवटी सर्वांचे आभार प्रदर्शन डॉ. बाळासाहेब शिंगोटे यांनी अत्यंत अभ्यासपूर्ण रीतीने केले.

उपस्थित मान्यवरांनी आपल्या मोलाच्या मार्गदर्शनातून नवोदित कवींना भरभरून प्रोत्साहन दिले. मुख्य संपादक सुदाम साळुंके सरांचे सातत्याने लाभलेले प्रेरणादायी मार्गदर्शन आणि त्यांच्या अर्धांगिनी, 'अक्षरधन पब्लिकेशन'च्या प्रकाशक सौ. प्रतिभा सुदाम साळुंके व सुपुत्र उमेश साळुंके यांच्या मनापासूनच्या तांत्रिक सहकार्यामुळेच हा सोहळा यशस्वीरीत्या पार आल्याची कृतज्ञता यावेळी व्यक्त करण्यात आली.

या काव्यसंग्रहाच्या निमित्ताने आयोजित राज्यस्तरीय काव्यस्पर्धेततून निवडक उत्कृष्ट कवितांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. विजेत्या कवी-कवयित्रींच्या नावांची अधिकृत घोषणा सहसंपादक अशोक शेटे यांनी केली. यामध्ये धुळे येथील डॉ. अश्विनी काचरे यांच्या 'तपयोगी' या कवितेने प्रथम क्रमांक, श्रीगोंदा येथील संजय ओहळ (देवा) यांच्या 'बाप' या कवितेने द्वितीय क्रमांक, तर संगमनेर येथील सौ. सुनीता जयराम घुले यांच्या 'देह' या कवितेने तृतीय क्रमांक पटकावला.

मुख्य पुरस्कारांसोबतच नवोदित आणि बाल कवींच्या कलागुणांना वाव देण्यासाठी प्रोत्साहनपर पुरस्कार जाहीर करण्यात आले, ज्यामध्ये एका आश्रमशाळेतील दोन विद्यार्थ्यांसह इतर गुणवंत कवींचा गौरव करण्यात आला. यामध्ये श्रीमती सुनीता सुशांत शिकदार (गडचिरोली - काव्य: नारीशक्ती), कु. कनक दत्तात्रय पुजारी (कोल्हापूर - काव्य: स्वप्न), चि. शुभम चांदणी सुजीत क्षीरसागर (साखरवाडी - काव्य: माझी आई), चि. काव्य मंगल कबीर काळेल (पंढरपूर - काव्य: आला उन्हाळा) आणि चि. मनोहर वर्षा दिनेश सोळंकी (साखरवाडी - काव्य: हा देश माझा) यांचा समावेश आहे.

भावनांना शब्दांची आणि शब्दांना चित्रांची साथ हे ब्रीद घेऊन साकारलेला हा अद्वितीय काव्यसंग्रह सर्व वाचकांसाठी पूर्णपणे मोफत उपलब्ध करून देण्यात आला आहे. 'शब्द सुमनांजली' म्हणजेच शब्दरूपी फुलांची ओंजळ असून, सुदाम साळुंके सरांनी या ओंजळीतील शब्दांना कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (-ख) सहाय्याने अधिक सुगंधित आणि देखणे रूप दिले आहे, अशा भावना यावेळी सहभागी कवींनी व्यक्त केल्या. कार्यक्रमाच्या शेवटी उत्कृष्ट नियोजनाबद्दल संपादक मंडळ, कवी-कवयित्री, शिक्षक आणि साहित्यप्रेमींचे मन:पूर्वक अभिनंदन करण्यात आले. आगामी काळात या समूहाच्या माध्यमातून 'फुलोरा' सारखे नवनवीन शैक्षणिक आणि साहित्यिक उपक्रम सातत्याने राबवले जातील, असा संकल्प यावेळी सोडण्यात आला.


CHANGE IN NAME

I HAVE CHANGED MY OLD NAME
ASHMA KADAR SAIKH
NEW NAME AS
AASMA AZIZALI SAYYED
ADD – GHAR NO 118, JORVE NAKA , NAIKWADPURA, SANGAMNER, TAL- SANGAMNER , DIST - AHMEDNAGAR

CHANGE IN NAME

I HAVE CHANGED MY OLD NAME IS
QURAISHI SANIYA GULAM SAMDANI
NEW NAME IS
SANIYA KAMAR ALI SAUDAGAR
ADRESS:- BHARAT NAGAR KAMAL PETROL PUMP MAGE SANGAMNER 422605 DIST AHILYANAGAR

SMFRI'S

**Vamanrao Ithape Homoeopathic Medical College & Hospital,**

Tajane Mala New Nagar Road Sangamner Dist: A'Nagar (Pin 422 605)
Tel. No. (02425) 225014 www.smfri.org Email:- vihmc2016@gmail.com

Applications are invited for the Post of Professor, Reader and Lecturer as per N C H Norms and direction 01/2017 of MUHS Nashik.

| Sr. No | Department / Subject | Vacant Post | | |
|---|---|---|---|---|
| | | Professor | Associate Professor(Reader) | Assistant Professor (Lecturer) |
| 1 | Pathology & Microbiology | - | 1 (Open) | - |
| 2 | Surgery | 1 (Open) | - | - |
| 3 | Research Methodology & Biostatics | 1 (Open) | - | - |

Contact :-
Principal -9822524202 CEO - 9822791484

पाहिजेत
सार्थक ॲग्रोव्हेट या नामांकित कंपनी करिता
टेलीकॉलर महिला - २
ड्रायव्हर - २
नाशिक पुणे हायवे, छत्रपती चौक, घुलेवाडी, संगमनेर
९५५२५०६३६३

भाड्याने देणे आहे
संगमनेर शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी
२००० स्क्वेअर फिट ३ मजले, एकूण ६००० स्क्वेअर फिट बांधकाम असलेली प्रशस्त इमारत भाड्याने देणे आहे
● पिण्यासाठी नगरपालिकेचे नळ कनेक्शन ● वापरासाठी स्वतंत्र बोरिंग सुविधा
● थ्री फेज लाईट कनेक्शन उपलब्ध ● व्यवसाय, ऑफिस, क्लासेस, हॉस्पिटल, इत्यादींसाठी उत्तम जागा
पत्ता : नाशिक – पुणे हायवे, सह्याद्री कॉलेजच्या पाठीमागे, संगमनेर, ता. संगमनेर , जि. अ.नगर
- संपर्क -
9822258458

पाहिजेत
आत्मशांती टी सेंटर (सपट चहा)साठी जागा भरणे आहे.
हेल्पर - ०२
ड्रायव्हर - ०१
सेल्समन - ०१
संपर्क- नेहरु चौक, संगमनेर
9922113534
9730468090

घर विक्रीसाठी आहे
अकोले-नाशिक बायपास रोड डेरे इंग्लीश शाळेजवळ संगमनेर येथे १५०० चौ फूट उत्तरमुखी २० फुटी रोड टच सर्व सोईनेयुक्त टायटल क्लिअर घर विकणे आहे
आशा पवार
8999362929

पाहिजेत
स्पेशल सिक्युरिटी फोर्स व बाऊन्सर सर्विसेस
सिक्युरिटी गार्ड - ५
महिला - ३
सफाई कर्मचारी - ५
हेल्पर - ५
संपर्क - तिरंगा चौक, मालदाड रोड, संगमनेर
7709828846







पाहिजेत
श्री गणेश डिस्ट्रीब्यूटर
श्री गणेश टायर्स
या फॉर्मसाठी
सेल्समन -3
सुपर कॅरी ड्रायव्हर - 1
कामाचा अनुभव आवश्यक
9423793758

कामगार भरती
अकाउंटंट - ०१ (स्त्री/पुरूष)
स्त्री/ पुरूष, टॅलीचे ज्ञान आवश्यक
सेल्समन- ०५ (पुरूष)
अनुभवी, संभाषण कौशल्य आवश्यक
वॉचमन- ०१
ठिकाण – रमेश डिपार्टमेंटल स्टोअर्स अशोक चौक, संगमनेर
9028342110
9262625962

जागा भाड्याने देणे
३ मजली
८०० स्केफूट
ठिकाण - मोमीनपुरा चौक,फेमस शुज समोर, संगमनेर
9028342110

पाहिजेत
डॉक्टर्स ०२- महिला (बी.ए.एम.एस/एम.डी.)
पंचकर्म थेरपिस्ट - ४ (स्त्री/पुरूष) ट्रेनिंग दिले जाईल
रिसेप्शनिस्ट - २ (महिला) कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक
ओ. टी. ॲसिस्टंट - १ (पुरूष)
माधवबाग क्लिनिक
९३२५०२८६८६

# पशुपालकांसाठी शून्य टक्के व्याजदराने ३ लाखांपर्यंत कर्ज - आ. अमोल खताळ

**पशुपालक आणि दुग्धव्यवसाय करणारे शेतकरी हे ग्रामीण अर्थव्यवस्थेचे महत्त्वाचे आधारस्तंभ आहेत. त्यांच्या व्यवसायाला आर्थिक बळ मिळावे, पशुधनाच्या संगोपनासाठी आवश्यक भांडवल सहज उपलब्ध व्हावे आणि शेतकऱ्यांना सावकारीपासून दिलासा मिळावा, यासाठी शासनाने 'पशुसंवर्धन किसान क्रेडिट कार्ड' ही अत्यंत उपयुक्त योजना सुरू केली आहे. नियमित कर्जफेड करणाऱ्या पशुपालकांना शून्य टक्के व्याजदराचा लाभ मिळणार असल्याने या योजनेचा जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा.**

**– आमदार अमोल खताळ**

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - महाराष्ट्र सरकार शेती आणि शेतीपूरक व्यवसायांना सातत्याने पाठबळ देत असून शासनाने पशुपालकांसाठी महत्वपूर्ण योजना सुरू केली आहे. पशुसंवर्धन विभागामार्फत 'पशुसंवर्धन किसान क्रेडिट कार्ड' मोहीम राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत पशुपालकांना शून्य टक्के व्याजदराने ३ लाखांपर्यंत अर्थसहाय्य उपलब्ध होणार असून यामुळे शेतकर्यांना मोठा आर्थिक आधार मिळणार असल्याची माहिती आमदार अमोल खताळ यांनी दिली.

संगमनेर तालुक्यातील अनेक शेतकरी दुग्धव्यवसाय करून आपला उदरनिर्वाह करत आहेत. या शेतकऱ्यांच्या व्यावसाय वाढीसाठी तसेच पशुधनाच्या देखभाल व दैनंदिन खर्चासाठी भांडवल उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. पशुपालकांची हीच गरज ओळखून शासनाकडून 'पशुसंवर्धन किसान क्रेडिट कार्ड' योजना ठोसपणे राबविण्यात येणार असल्याचे आमदार खताळ यांनी स्पष्ट केले.



आमदार अमोल खताळ यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात सविस्तरपणे नमूद केले आहे की; पशुपालन, शेळी-मेंढीपालन, कुक्कुटपालन आणि वराहपालन करणाऱ्या शेतकऱ्यांना या योजनेच्या माध्यमातून व्याज सवलतीसह अर्थसहाय्य दिले जाणार आहे. ज्या शेतकऱ्यांकडे किसान क्रेडिट कार्ड नाही, त्यांना १.६० लाख रुपयांपर्यंतचे कर्ज विनातारण उपलब्ध करून दिले जाईल. दूध संस्थेच्या हमीवर ही मर्यादा ३ लाख रुपयांपर्यंत वाढवता येते. तसेच, ज्यांच्याकडे आधीच किसान क्रेडीट कार्ड आहे, त्यांनाही ३ लाखांपर्यंतची पतमर्यादा वाढवून घेता येईल.

कर्जाचा मूळ व्याजदर ९% असला तरी, नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना केंद्र सरकारकडून ३% आणि राज्य शासनाकडून ४% अशी एकूण ७% पर्यंत व्याज सवलत मिळणार आहे. बँकांनाही यात २% व्याज सवलत देण्यात आली आहे. त्यामुळे नियमित कर्जफेड करणाऱ्या पशुपालक किंवा शेतकऱ्यांना या योजनेंतर्गत शून्य टक्के व्याजदराचा लाभ घेता येणार आहे. जे पशुपालक दूध सोसायटी, दूध संघ किंवा दूध उत्पादक कंपनीचे सभासद आहेत व ज्यांनी अद्याप या योजनेचा लाभ घेतलेला नाही, असे सर्व शेतकरी यासाठी पात्र असणार आहेत. याशिवाय अधिक माहितीसाठी नजीकच्या पशुवैद्यकीय दवाखाना अथवा १९६२ या हेल्पलाइन नंबरवर संपर्क साधावा, असेही आवाहन आमदार अमोल खताळ यांनी केले.

# कर्जमाफीच्या अटीशर्ती रद्द करा या मागणीसाठी किसान सभेची निदर्शने



युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले - कर्जमाफीच्या शासनादेशामध्ये मोठ्या प्रमाणात अटी शर्ती लावल्यामुळे बहुसंख्य शेतकरी कर्जमाफी पासून वंचित राहणार आहेत. २०१९ चा ज्या शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ मिळाला त्यांना २०२६ कर्जमाफीमध्ये केवळ पन्नास हजार रुपयांच्या मर्यादित लाभ देण्यात येणार असून त्यातही त्यांना त्यांच्यावरील उर्वरित कर्ज पूर्णपणे भरण्याची अट टाकण्यात आली आहे.

नियमित कर्जदार शेतकऱ्यांना सुद्धा किमान चार वेळा कर्ज भरले असण्याची अट टाकण्यात आलेली आहे. अशा शेतकऱ्यांना सुद्धा केवळ पन्नास हजार रुपये देण्यात येणार आहेत. सरकारने या अटी शर्ती तातडीने रद्द कराव्या व शेतकऱ्यांचा सातबारा संपूर्ण कोरा करण्याच्या आश्वासन पाळावे अशी मागणी करत किसान सभेने राज्यभर आंदोलन सुरू केले आहे. चौका चौकात शासनादेश जाळून तसेच निदर्शने करून आंदोलन तीव्र केले जात आहे.

अहिल्यानगर येथील अकोले तालुक्यामध्ये निदर्शने करून तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले. सहकारी सोसायटयांचे चेअरमन व सचिवांना निवेदने देऊन त्यांच्या मार्फत आपले म्हणणे राज्य सरकारपर्यंत पोहोचवण्याची मोहीम किसान सभेचे राज्यसचिव डॉ. अजित नवले सुरू केली आहे.

# शाळेचे मैदान की तमाशाचे गोडाऊन ?

## कुरकुटवाडीतील ग्रामस्थ आक्रमक

युवावार्ता (प्रतिनिधी)

घारगाव- संगमनेर तालुक्याच्या पठारभागातील कुरकुटवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या आवारात तमाशाचे साहित्य आणि वाहने उभे करून मैदान बळकावण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा गंभीर आरोप ग्रामस्थांनी केला आहे. या साहित्यामुळे विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला असून, प्रशासनाने १५ जूनपर्यंत हे साहित्य न हटवल्यास तीव्र उपोषणाचा इशारा घारगाव पोलिसांना दिलेल्या निवेदनातून ग्रामस्थांनी दिला आहे.

याबाबत घारगाव पोलीस ठाण्यात देण्यात आलेल्या निवेदनानुसार, कुरकुटवाडी येथील आकाश हरिभाऊ कुरकुटे यांना २०२३ मध्ये शाळेच्या परिसरातील एक खोली भाडेतत्त्वावर देण्यात आली होती. मात्र, २०२५ मध्ये मुदत संपूनही आणि वारंवार सांगूनही त्यांनी ही खोली खाली केली नाही. उलट, गेल्या काही काळापासून शाळेच्या संपूर्ण पटांगणात तमाशाचे साहित्य, गाड्या आणि जनरेटर लावून जागा बळकावण्याचा प्रयत्न मंडळाच्या सुरू असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. या विषयावर पुणे-मुंबईकर बैठकांसह अनेक ग्रामसभांमध्ये चर्चा झाली, मात्र संबंधित व्यक्तीने याकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले आहे.

शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष रामा कुरकुटे यांनी सांगितले, गेल्या २५ ते २६ वर्षांपासून हा प्रकार सुरू असून, वारंवार सांगूनही दखल घेतली जात नाही. मैदानावर साहित्याचे ढिगारे पडल्यामुळे तिथे घाण साचली असून, साप व इतर विषारी प्राण्यांचा सुळसुळाट झाला आहे. शाळा सुरू झाल्यावर लहान मुले येथे खेळतात, त्यामुळे त्यांच्या जीवाला मोठा धोका निर्माण झाला आहे. प्रशासनाने हे मैदान तातडीने मोकळे करून द्यावे. ग्रामस्थ सोमनाथ कुरकुटे यांनीही या प्रकरणी तीव्र संताप व्यक्त केला आहे. यापूर्वीही घारगाव पोलीस ठाण्यात निवेदन देऊन गुन्हा दाखल करण्यात आला होता, मात्र तरीही परिस्थितीत सुधारणा झालेली नाही. १५ जूनपर्यंत जर हे साहित्य हटवले नाही, तर गावातील सर्व तरुण आणि ग्रामस्थ उपोषणाला बसणार आहेत. तसेच या कालावधीत मैदानातील वस्तूंना काही नुकसान झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित व्यक्तीची राहील, असेही निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे.

# घरगुती वादातून पत्नी आणि मुलीला मारहाण

युवावार्ता (प्रतिनिधी)

घारगाव - शेळ्या, मेंढ्या विकून आलेले पैसे दिले नाहीत आणि चारित्र्यावर संशय घेऊन दारुड्या पतीने व मुलाने मिळून पत्नीला बांबूच्या दांड्याने - आणि लाथाबुक्क्यांनी जबर मारहाण केल्याची धक्कादायक घटना दरेवाडी (ता. संगमनेर) येथे घडली आहे. या मारहाणीत पीडित महिला गंभीर जखमी झाली असून, सोडवासोडव करायला आलेल्या मुलीलाही जीवे मारण्याची धमकी देण्यात आली आहे. याप्रकरणी घारगाव पोलीस ठाण्यात पती आणि मुलावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, प्रियंका दीपक सोनवणे (वय ३३) या पती दीपक रुंजा सोनवणे, मुलगा आणि मुलगी किरण यांच्यासह रा-हतात. त्यांचे कुटुंब वाट्याने शेती करून आपला उदरनिर्वाह करतात. मात्र, पती दीपक याला दारूचे व्यसन असून तो नेहमी दारू पिऊन प्रियंका यांच्या चारित्र्यावर संशय घेत असे व त्यांना शिवीगाळ, मारहाण करत असे. गुरुवारी (दि.४) रोजी रात्री ९ वाजेच्या सुमारास पती दीपक आणि मुलगा हे दोघे दारू पिऊन घरी आले. घरी आल्यावर त्यांनी प्रियंका यांच्याकडे, तू जे बकरे विकले त्याचे पैसे कुठे ठेवले आहेत, ते आम्हाला दे अशी मागणी केली. यावर प्रियंका यांनी मी २० हजार रुपये मुलगी किरण हिच्या नावावर जमा केले असून उर्वरित पैशांमधून किराणा दुकानाची उधारी चुकवली आहे, असे सांगितले.

या उत्तराचा राग आल्याने पती दीपक आणि मुलाने प्रियंका यांना अत्यंत घाणेरड्या भाषेत शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. तसेच त्यांच्या चारित्र्यावर संशय घेऊन, घरातील बांबूच्या दांड्याने प्रियंका यांच्या डाव्या हातावर आणि डाव्या मांडीवर बेदम मारहाण केली. एवढ्यावरच न थांबता दोघांनी त्यांच्या तोंडावर लाथाबुक्क्यांनी जबर मारहाण करून त्यांना जखमी केले.

आईला होत असलेली मारहाण पाहून मुलगी किरण ही मध्यस्थी करण्यासाठी आणि आईला सोडवण्यासाठी धावून आली. मात्र, पती आणि मुलाने तिलाही धमकावले. जर तू आवाज केलास, तर तुला आणि तुझ्या आईला संपवून टाकू, अशी जीवे मारण्याची धमकी त्यांनी दिली. या घटनेनंतर पीडित महिलेने घारगाव पोलीस ठाण्यात धाव घेऊन आपबिती सांगितली. त्यावरुन पती दीपक सोनवणे आणि मुलगा यांच्याविरुद्ध भारतीय न्यायसंहितेच्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक हेमंत थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस कॉन्स्टेबल दत्तू चौधरी करत आहे.

# नांगरलेली शेती पावसाच्या सरींच्या प्रतीक्षेत




**जून महिना सुरू होऊनही अद्याप समाधानकारक पावसाचे आगमन झालेले नाही. खरीप हंगामाच्या तयारीसाठी शेतकऱ्यांनी शेतीची मशागत पूर्ण केली असून नांगरलेली शेतजमीन आता पहिल्या पावसाच्या सरींची आतुरतेने वाट पाहत आहे. पावसाला उशीर होत असल्याने शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. (छाया – सुशांत सातपुते)**

# गुटखा माफियांचा महिला अधिकाऱ्यांवर जीवघेणा हल्ला

छ. संभाजी नगर (दि.१०)

छत्रपती संभाजीनगर येथे गुटखा माफियांविरोधात सुरू असलेल्या कारवाईदरम्यान महिला अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांच्या अंगावर वाहन घालून त्यांना जीवे मारण्याचा प्रयत्न झाल्याची खळबळजनक गंभीर घटना घडली.या घटनेची तातडीने अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ,यांनी दखल घेत संबंधित महिला अधिकाऱ्यांशी थेट फोनवरून संवाद साधत त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली आणि शासन त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे असल्याचा विश्वास दिला.

मंत्री नरहरी झिरवाळ,यांनी या घटनेचा तीव्र शब्दांत निषेध व्यक्त करीत 'प्रशासकीय कर्तव्य बजावणाऱ्या अधिकाऱ्यांवर हल्ले करणाऱ्या गुटखा माफियांची गय केली जाणार नाही,'असा इशारा दिला.या प्रकरणातील दोषींवर आणि संबंधित गुटखा माफियांवर कठोरतम कायदेशीर कारवाई करण्याचे आदेश पोलीस प्रशासन आणि अन्न व औषध प्रशासन विभागाला देण्यात आले आहेत.

मंत्री नरहरी झिरवाळ,यांनी अशा दबावतंत्राला बळी न पडता अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.कायदा सुव्यवस्था कायम राखत.जनतेच्या आरोग्याशी खेळणाऱ्या कोणालाही सोडले जाणार नाही,असे मंत्री नरहरी झिरवाळ स्पष्ट शब्दात सांगितले आहे.

घटनेनंतर अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या तक्रारीवरून वाळूज एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जीवे मारण्याचा प्रयत्न, सरकारी कामात अडथळा निर्माण करणं आणि धमकी देणं यासह विविध कलमान्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पोलिसांनी दोन संशयितांना ताब्यात घेतलं असून पुढील तपास पोलीस करत आहे.

# अंतराळातील सर्वात मोठ्या प्रयोगशाळेचा शेवट

मुंबई (वृत्तसंस्था)

पृथ्वीपासून सुमारे ४०० किलोमीटरवर गेल्या २५ वर्षांपासून मानवतेची सर्वात मोठी अंतराळ प्रयोगशाळा म्हणून कार्यरत असलेले आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानक आता त्याच्या अंतिम टप्प्यात पोहोचले आहे. नासाने २०२८ पासून सुरू करून २०३० पर्यंत ते सुरक्षितपणे पृथ्वीवर पाडण्याची आपली योजना सार्वजनिक केली आहे. यासाठी नासाने १ अब्ज डॉलर (सुमारे ९५०० कोटी रुपये) चा आराखडा तयार केला आहे.




आयएसएसने त्याचे निर्धारित आयुष्य पूर्ण केले आहे. त्याचा कार्यकाळ अनेक वेळा वाढवण्यात आला आहे. गेल्या काही वर्षांपासून त्यात सातत्याने तांत्रिक बिघाड होत आहेत. स्थानक सुरक्षित ठेवण्यासाठी अब्जावधी डॉलर्स खर्च होतात. नासा आता आपले संसाधने चंद्र आणि मंगळ मोहिमांवर केंद्रित करू इच्छित आहे. म्हणून आयएसएसला सन्मानजनक आणि सुरक्षित मार्गाने निवृत्त करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सुमारे ४.५ लाख किलोग्राम वजनाच्या ISS ला असेच पृथ्वीकडे पडू दिले जाणार नाही. २०२८ च्या आसपास, स्थानकाला कक्षेत ठेवण्याची प्रक्रिया हळूहळू बंद केली जाईल. विशेष अंतराळयानाने त्याला नियंत्रित पद्धतीने पृथ्वीच्या वातावरणात ढकलले जाईल. वातावरणात प्रवेश करताच, स्थानकाचा बहुतेक भाग घर्षणामुळे जळून नष्ट होईल.

तथापि, यानंतरही अंतराळातील मोठे तुकडे पृथ्वीवरील लोकवस्तीच्या भागात पडू शकतात. म्हणून, नासाने पॅसिफिक महासागरातील एक दुर्गम क्षेत्र निवडले आहे, जेणेकरून वातावरणात जळाल्यानंतर उरलेला कचरा याच निर्जन सागरी क्षेत्रात पडेल.

NASA च्या मते, ISS ला दक्षिण प्रशांत महासागराच्या क्षेत्रात क्रॅश केले जाईल. या जागेचे नाव पॉइंट नीमो आहे. ही जागा जुने स्पेस स्टेशन, उपग्रह आणि इतर कचरा विल्हेवाट लावण्यासाठी जागतिक स्तरावर खास निवडली गेली आहे. पॉइंट नीमोच्या आसपास कोणत्याही जहाजाला जाण्यास बंदी आहे. येथे मानवांना राहण्यासाठी कोणतीही जागा नाही. सन १९७१ पासून आतापर्यंत सुमारे ३०० प्रकारचा अंतराळातील कचरा येथे टाकला गेला आहे. यात बहुतेक अमेरिकन आणि रशियन कचरा समाविष्ट आहे.

# ज्ञानभारतम ॲपवर सन 1950 पूर्वीची हस्तलिखिते अपलोड करावीत

## जिल्हा ग्रंथालयाचे आवाहन

जिल्हा माहिती कार्यालय -

अहिल्यानगर- जिल्ह्यातील सर्व नागरिक तसेच ग्रंथालयांनी ज्ञानभारतम पवर सन १९५० पूर्वीची हस्तलिखिते, पोथ्या, पुराणे तसेच योग, आरोग्य, अंकगणित, विज्ञान, खगोलशास्त्र आदी विषयांवरील साहित्याची नोंद दि. १५ जून २०२६ पर्यंत अपलोड करण्याचे आवाहन जिल्हा ग्रंथालय अधिकाऱ्यांनी केले आहे.

या उपक्रमांतर्गत सध्या हस्तलिखितांची संख्या, भाषा, लिपी तसेच साहित्याची स्थिती याबाबतची प्राथमिक माहिती नोंदवावयाची असून संबंधित साहित्याच्या आतील पृष्ठांची दोन ते तीन छायाचित्रेही अपलोड करावयाची आहेत. माहिती भरताना गुगल लोकेशन सेवा सुरू ठेवणे आवश्यक असून त्यामुळे संबंधित साहित्य नेमके कुठे उपलब्ध आहे, याची नोंद करणे सुलभ होईल. ज्ञानभारतम ॲप प्ले स्टोअरवर उपलब्ध असून त्याद्वारे माहिती सहजपणे अपलोड करता येईल. संबंधित हस्तलिखितांवरील मालकी हक्क मूळ धारकांकडेच कायम राहणार असून केंद्र शासनाकडून




केवळ त्या साहित्याचे डिजिटायझेशन करण्यात येणार आहे. या प्रक्रियेचा संपूर्ण खर्च केंद्र शासनामार्फत करण्यात येणार आहे.

नागरिकांनी आपल्या वैयक्तिक संग्रहातील तसेच ग्रंथालयांमधील साहित्याबरोबरच परिसरातील खासगी व्यक्ती, मंदिरे, मशिदी, महानुभाव आश्रम आदी ठिकाणी उपलब्ध हस्तलिखिते आणि प्राचीन साहित्य यांची ज्ञानभारतम पवर नोंद करण्यासाठी पुढाकार घ्यावा, असेही आवाहन करण्यात आले आहे.

## विदर्भातील शाळा ७ दिवस उशीरा

मुंबई (वृत्तसंस्था)

विदर्भातील तापमानाचा पारा वाढलेला असताना आणि उष्णतेच्या लाटेचे चटके बसत असताना अखेर शिक्षण विभागाने शाळा सुरू करण्याबाबत मोठा निर्णय घेतला आहे. विदर्भातील शाळा आता नियोजित १५ जूनऐवजी २२ जून पासून सुरू होणार आहेत. कडाक्याच्या उन्हामुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर होणारा परिणाम लक्षात घेऊन हा बदल करण्यात आला आहे.विदर्भातील कडाक्याच्या उष्णतेमुळे शाळा १५ जूनऐवजी २६ जूनपासून सुरू कराव्यात, अशी आग्रही मागणी विविध शिक्षक आणि पालक संघटनांनी केली होती. मात्र, सुरुवातीला सरकारकडून या मागणीला सकारात्मक प्रतिसाद मिळत नसल्याचे पाहून शिक्षक संघटनांनी थेट उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती.

पाईल्सचा कायमचा उपाय !
वेदना, रक्तस्त्राव, जळजळ?
आता सुरक्षित आणि सोप उपचार उपलब्ध
पाईल्स (PILES) | फिशर (FISSURE) | फिस्टुला (FISTULA)
फोन नं. ०२४२५-२२००५०
ताम्हाणे हॉस्पिटल
अधुनिक उपचार पद्धती
● कमी वेदना, जलद बरे होणे
● लेझर व प्रगत तंत्रज्ञान
● अनुभवी जज्ञ डॉक्टरांचा सल्ला
● गोपनीयतेची पूर्ण काळजी
आजचा संपर्क करा- 7219100100
सुरक्षित उपचार | अनुभवी टीम | लवकर आराम | आपली सेवा आमची बांधिलकी
पत्ता - इंदिरानगर, गल्ली नं. १०, विठ्ठल मंदिराजवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर

दैनिक युवावार्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

पेजिनेशनसाठी अनुभवी व्यक्ती पाहिजे
GRAPHIC DESIGNER
Send Resume on Whatsapp
Contact : 7720046005



भंडारी
"शुभकार्यासाठी शुभवस्त्रखरेदी"
शेरवाणी । कुर्तापायजमा । ब्लेझर । जोधपुरी
पैठणी । घागरा । शालु । कांजीवरम । प्युअरसिल्क । डिजायनर साडीज्
मेनरोड कॉर्नर, संगमनेर

# चॅप्टर केस बॉण्डचे उल्लंघन

## तिघांकडून ९० हजार रुपये शासन जमा

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार आणि समाजविघातक प्रवृत्तीच्या व्यक्तींवर प्रतिबंधक कारवाई अधिक प्रभावी करण्याच्या दृष्टीने श्रीरामपूर विभागात महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे. चॅप्टर केसेसमध्ये चांगल्या वर्तणुकीसाठी घेतलेल्या बंधपत्रांचे उल्लंघन केल्याप्रकरणी तिघांकडून एकूण ९० हजार रुपये शासन जमा करण्यात आले आहेत.

महाराष्ट्र शासनाच्या अधिसूचनेनुसार विशेष कार्यकारी दंडाधिकारी म्हणून कार्यरत असलेले अपर पोलीस अधीक्षक, श्रीरामपूर यांच्यासमोर भारतीय नागरिक सुरक्षा संहिता (BNSS) कलम १२६, १२७, १२८ व १२९ अंतर्गत चॅप्टर केसेसची सुनावणी होते. अशा प्रकरणांमध्ये भविष्यात गंभीर स्वरूपाचे गुन्हे घडण्याची शक्यता असलेल्या व्यक्तींकडून शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी जामीनदारासह बंधपत्र घेतले जाते.

बंधपत्राच्या कालावधीत कोणताही दखलपात्र अथवा अदखलपात्र गुन्हा न करणे, कोणाच्याही मूलभूत हक्कांवर गदा आणणार नाही, शरीर किंवा मालमत्तेविरुद्ध गुन्हे करणार नाहीत, तसेच कार्यकारी दंडाधिकाऱ्यांनी बोलावल्यास हजर राहतील अशा अटींचा समावेश असतो. अटींचा भंग झाल्यास बंधपत्रातील अमानत रक्कम जप्त करण्याची तरतूद आहे.

मात्र खालील तिघांनी बंधपत्र कालावधीत नव्याने गुन्हे केल्याचे निष्पन्न झाल्याने भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम ४९१(१) अन्वये बॉण्ड उल्लंघनाची प्रक्रिया राबविण्यात आली व त्यांच्याकडून बंधपत्राची रक्कम वसूल करण्यात आली.

नितीन राशिनकर, रा. रस्तापूर, ता. नेवासा - ५०,०००, अक्षय रामदास चेमटे, रा. घोडेगाव, ता. नेवासा ३०,०००, फिरोज नवाब शेख, रा. शेडगाव, ता. संगमनेर - १०,००० या कारवाईसाठी सोनई पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अनिल मोरे, शनि शिंगणापूर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक आशिष शेळके आणि आश्वी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सुदाम शिरसाठ यांनी प्रस्ताव सादर केले होते.

पोलीस प्रशासनाने स्पष्ट केले आहे की, विशेष कार्यकारी दंडाधिकारी यांच्यासमोर बंधपत्र करून दिल्यानंतर संबंधित व्यक्तीने पुन्हा गुन्हा केल्यास बंधपत्र भंगाची कारवाई करण्यात येईल. तसेच आकारलेला दंड न भरल्यास संबंधितांना न्यायालयीन कोठडीत पाठविण्याचीही कायद्यात तरतूद आहे. या कारवाईमुळे रेकॉर्डवरील गुन्हेगारांमध्ये धाक निर्माण झाला असून प्रतिबंधक कारवाई अधिक प्रभावी ठरत असल्याचे पोलीस प्रशासनाकडून सांगण्यात आले.

# हजारो नागरिकांना एसटी सवलतींचा लाभ

## आमदार खताळांच्या पुढाकारातून स्मार्ट कार्ड मोहीम





### लोकाभिमुख उपक्रमांना प्राधान्य...

**नागरिकांना शासकीय योजनांचा लाभ मिळविताना कोणत्याही प्रकारची अडचण येऊ नये, यासाठी भविष्यातही अशाच लोकाभिमुख उपक्रमांना प्राधान्य दिले जाणार आहे. शासनाच्या सेवा आणि सुविधा थेट नागरिकांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न सातत्याने सुरू राहील. स्मार्ट कार्ड वितरण मोहिमेच्या यशस्वी अंमलबजावणीमुळे संगमनेर तालुक्यातील हजारो कुटुंबांसाठी एसटीच्या प्रवासी सवलत योजनांचे दरवाजे अधिक व्यापकपणे खुले झाले असून, ग्रामीण भागात प्रशासनाविषयीचा विश्वासही अधिक दृढ झाला आहे. नागरिकांच्या दैनंदिन प्रवासाला दिलासा देणारा हा उपक्रम तालुक्यासाठी एक महत्त्वाचा आदर्श ठरत आहे.**

**आ. अमोल खताळ, संगमनेर**

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर तालुक्यातील नागरिकांना राज्य परिवहन महामंडळाच्या विविध प्रवासी सवलत योजनांचा लाभ सुलभ आणि जलद पद्धतीने मिळावा यासाठी संगमनेर बसस्थानक आगार प्रशासनाच्या व आमदार अमोल खताळ यांच्या पुढाकारातून तालुक्यातील विविध भागांमध्ये तब्बल ४० विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात आले. या शिबिरांद्वारे सुमारे ६ हजार लाभार्थ्यांना स्मार्ट कार्डचे वितरण करण्यात आले असल्याची माहिती आमदार अमोल खताळ यांनी पत्रकार परिषदेत दिली.

राज्य शासनाच्या विविध प्रवासी सवलत योजनांचा लाभ घेण्यासाठी स्मार्ट कार्ड अनिवार्य असल्याने अनेक नागरिकांना बसस्थानकात वारंवार जावे लागत होते. विशेषतः ज्येष्ठ नागरिक, महिला, दिव्यांग व्यक्ती तसेच दुर्गम ग्रामीण भागातील नागरिकांना याचा मोठा त्रास सहन करावा लागत होता. ही गैरसोय दूर करण्यासाठी गावागावांत जाऊन विशेष शिबिरे आयोजित करण्यात आली. त्यामुळे लाभार्थ्यांना स्वतःच्या गावातच नोंदणी, कागदपत्र पडताळणी आणि स्मार्ट कार्ड वितरणाची सुविधा उपलब्ध झाली.

या शिबिरांमध्ये लाभार्थ्यांची नोंदणी, आवश्यक कागदपत्रांची तपासणी तसेच स्मार्ट कार्ड वाटपाची प्रक्रिया अत्यंत सुलभ आणि पारदर्शक पद्धतीने पार पडली. आगार प्रशासनाने केलेल्या नियोजनबद्ध कामकाजामुळे अल्पावधीत मोठ्या संख्येने नागरिकांपर्यंत ही सेवा पोहोचविणे शक्य झाले. परिणामी, तालुक्यातील हजारो नागरिकांना शासनाच्या विविध प्रवासी सवलत योजनांचा लाभ घेण्याचा मार्ग अधिक सुलभ झाला आहे.

या उपक्रमामुळे ज्येष्ठ नागरिक, महिला आणि दिव्यांग लाभार्थ्यांनी समाधान व्यक्त केले असून ग्रामीण भागातील नागरिकांनी गावपातळीवरच सुविधा उपलब्ध करून दिल्याबद्दल आमदार अमोल खताळ आणि संगमनेर आगार प्रशासनाचे आभार मानले आहेत. नागरिकांमधून या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाल्याने प्रशासनालाही मोठ्या प्रमाणात दिलासा मिळाला आहे.

INVOFIX
आजच सोलर सिस्टीम लावा व आपले लाईट बिल शुन्य करा
शासनामार्फत मिळणारी सबसिडी
1KW 30,000/- Rupees
2KW 60,000/- Rupees
3KW 78,000/- Rupees
सौर उर्जा आजची गरज.. उद्याची बचत..
उपलब्ध सुविधा
१. बँक लोन सुविधा उपलब्ध
२. विज बिल शुन्य करा
३. मोफत मार्गदर्शन
४. फ्री साईट व्हिजीट
५. एक्स्पर्ट टिम, क्वालिटी वर्क
PM SURYA GHAR
आजच योजनेचा लवकरात लवकर लाभ घ्या व भरघोस सबसिडी मिळवा.
Invofix Solution Pvt. Ltd., स्वागत मंगल कार्यालया समोर, अकोले बायपास रोड, संगमनेर ४२२६०५, जि. अहिल्यानगर.
7030334486
7030334494

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का?
काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
SMBT BANK
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
✽ कर्ज रक्कम वाढ । ✽ कर्ज व्याजदर कमी । ✽ कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु॥, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

# वीजेच्या धक्क्याने तरुणाचा मृत्यू

युवावार्ता (प्रतिनिधी)



संगमनेर - घराचे बांधकामाला पाणी मारत असताना विजेचा धक्का बसल्याने एका तरुणाचा जागीच मृत्यू झाला. हि हृदयद्रावक घटना शहरातील इंदिरानगर येथील गल्ली नंबर दोन मध्ये मंगळवारी रात्री साडेदहाच्या सुमारास घडली. या घटनेनंतर परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

योगेश विलास गोसावी उर्फ बाळा वय २६ असे या दुर्घटनेत मृत्यू झालेल्या तरुणाचे नाव आहे. याबाबत मिळालेल्या माहितीनुसार मयत योगेश गोसावी हे इंदिरानगर येथील दोन नंबर गल्लीत वास्तव करीत होते. गोसावी परिवाराने त्यांच्या घराचे बांधकाम काढले होते. हे बांधकाम सुरू असताना योगेश गोसावी हे रात्री पाणी मारत असताना अचानक पाण्यात विजेचा करंट उतरला. त्याचा जोराचा धक्का बसल्याने योगेश जाग्यावर कोसळला. बाजुच्या नागरीकांनी धाव घेत वीज प्रवाह तातडीने बंद केला. योगेशला उपचारासाठी रूग्णालयात दाखल केले मात्र डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

योगेश गोसावी यांच्या पश्चात आई, वडील, भाऊ असा परिवार आहे. याप्रकरणी शहर पोलिसात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

अविवाहित, नवविवाहित, चाळीशिनंतरच्या, लठ्ठ, मधुमेह, थायरॉईड, PCOD सारखे हार्मोनल डिफेक्ट असलेल्या
स्त्रियांच्या समस्या
♦ मासिक पाळीच्या तक्रारी ♦ योनी मार्गाची दुर्गंधी
♦ अंगावरून पांढरे जाणे ♦ गुप्त अंगाला खाज
♦ गर्भ न रहाणे ♦ विविध त्वचा विकार
♦ वारंवार गर्भपात होणे ♦ गुप्तरोग, गर्मी
♦ गर्भाशयात गाठी ♦ लघवीला जळजळ
♦ गर्भाशयाचा कर्करोग ♦ संभोगात रस न येणे
♦ स्तनांची वाढ न होणे ♦ संभोग विषयीची भीती
♦ स्तनातून दूध न येणे ♦ हस्तमैथुनाची सवय
♦ स्तनात गाठी ♦ लैंगिक विकृती
♦ स्तनाचा कर्करोग ♦ मानसिक नैराश्य
डॉ. मोना अभय मुथा B.H.M.S., C.G.O., D.Ac होमिओपॅथिक कन्सल्टंट स्त्री रोग चिकित्सक (३० वर्षांचा प्रदीर्घ अनुभव)
1 लाखांहून अधिक महिलांचा यशस्वी उपचार | ISO मानांकन प्राप्त
डॉ. मुथाज् होमिओपॅथिक क्लिनिक विनायकनगर, नगर - पुणे रोड, अहिल्यानगर
www.homoeopathictreatment.in 91 30 30 90 13

दर्शन टेक्सटाईल मार्केट
सेल नवे होलसेल सेल मान्सून ऑफर
30% ते 70% डिस्काउंट
शालू | कांजीवरम | सिल्क पैठणी | बनारसी
संपर्क : 8390005001
जाणता राजा मार्ग, आय.डी.बी.आय बँक समोर, संगमनेर 422605

चैतन्य हॉस्पिटल
24 HRS EMERGENCY SERVICES
Health Emergencies Don't Wait. Neither DO WE
२४ तास सुविधांसाठी ०२४२५ - २२४७६२ मोबा. ७०३८२७०३८२
डॉ. जठार हॉस्पिटल
ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर

कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist
डॉ. निखील रहांगडाले Orthosurgeon
डॉ. सुनिल दिघे Cardiologist
डॉ. फैमुद्दीन शेख Medicine
• सर्जरी विभाग • डायलिसीस विभाग • हृदयरोग विभाग • जॉईंट रिप्लेसमेंट
• अतिदक्षता विभाग • सुपर स्पेशालिटी विभाग • मेडिसीन विभाग • स्पाईन सर्जरी
• अपघात विभाग • न्यूरोविभाग • अद्ययावत कॅथलॅब • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा 8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर (०२४२५) २२६६८८, २२६६८६

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर–४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25